| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ६४ वा | शनिवार, दिनांक २३ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## उद्योग भवनातील क्लासेस, हॉस्टेल बंद करण्याचे आदेश



**लातूर/प्रतिनिधी :** वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या नीट यूजी परीक्षेचा पेपर फुटल्याने देशभरात खळबळ उडाली आहे. सीबीआयने या प्रकरणात आतापर्यंत ११ जनास अटक केलेली आहे. यापैकी बहुतांश आरोपी महाराष्ट्रातील आहेत. सीबीआयने नीट परीक्षेतील भौतिकशास्त्राचे प्रश्न लीक केल्याप्रकरणी पुण्यातील मनीषा हवालदार या महिलेला अटक केली आहे.

हेच टायमिंग साधथ नीट पेपर फुटी प्रकरणानंतर चर्चेत आलेल्या लातूरच्या तथाकथित 'ट्युशन एरिया'वर आता प्रशासनाने मोठी कारवाई सुरू केली आहे. लातूर जिल्हा उद्योग केंद्राने लातूर इंडस्ट्रियल इस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमधील उत्पादनासाठी मंजूर गाळ्यांमध्ये सुरू असलेले सर्व व्यावसायिक उपक्रम तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला. जिल्हा उद्योग भवन परिसरातील अनेक गाळ्यांमध्ये खाजगी कोचिंग क्लासेस, हॉस्टेल्स, खानावळी, हॉटेल, अभ्यासिका, बुक सेंटर आणि इतर व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या.

मुळात हा परिसर उद्योग आणि उत्पादन व्यवसायासाठी उद्योजकांना लीजवर देण्यात आला होता. मात्र २००० नंतर येथील अनेक उद्योग बंद पडले आणि जागा मोठ्या प्रमाणात खाजगी ट्युशन व्यवसायासाठी भाड्याने दिली गेली. त्यामुळे ज्या उद्देशासाठी जागा देण्यात आली, तो उद्देशच हरवला अशी भूमिका घेत माहिती अधिकार कार्यकर्ते मल्लिकार्जुन भाईकट्टी गेल्या दहा वर्षांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा करत होते. मात्र राजकीय हस्तक्षेपामुळे निर्णय प्रलंबित असल्याचे बोलले जात होते.

नीट पेपर फुटी प्रकरण समोर आल्यानंतर प्रशासन सक्रिय झाले असून, लातूर औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेला पत्र पाठवून संबंधित सर्व खाजगी व्यवसाय तात्काळ बंद करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. आदेशाचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाईचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## देशात पेट्रोल ८७ पैसे आणि डिझेल ९१ पैशांनी महागले

### मध्य पूर्व संकटामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. दिल्लीत पेट्रोल ८७ पैशांनी महाग होऊन ९९.५१ प्रति लिटर झाले आहे. डिझेल ९१ पैशांनी प्रति लिटर महाग झाले आहे. त्याचे दर ९२.४९ वर पोहोचले आहेत.

**९ दिवसांत तिसऱ्यांदा वाढले दर**

गेल्या ९ दिवसांतील इंधनाच्या दरातील ही तिसरी वाढ आहे. यापूर्वी याच आठवड्यात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सरासरी ९० पैसे प्रति लिटर वाढ करण्यात आली होती. तर, त्यापूर्वी काही दिवसांपूर्वीही दरात ३ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली होती.

येथे तुमच्याद्वारे दिलेल्या डेटानुसार पेट्रोल आणि डिझेलच्या नवीन किमती, जुन्या किमती आणि फरक (वाढ) दर्शवणारे टेबल दिले आहे:

**इतर वस्तूंचे दरही वाढू शकतात**

मालवाहतूक वाढेल: ट्रक आणि टेम्पोचे भाडे वाढेल, ज्यामुळे इतर राज्यांतून येणाऱ्या भाज्या, फळे आणि रेशन महाग होतील.

शेतीचा खर्च: ट्रॅक्टर आणि पंपिंग सेट चालवण्यासाठी शेतकऱ्यांना जास्त खर्च करावा लागेल, त्यामुळे धान्याचा खर्च वाढेल.

बस-ऑटोचे भाडे: सार्वजनिक वाहतूक आणि स्कूल बसच्या भाड्यातही वाढ दिसून येऊ शकते.

**पेट्रोल-डिझेलच्या किमतीत वाढ का झाली?**

या वाढीचे मुख्य कारण आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आहे. इराण आणि अमेरिकेचे युद्ध सुरू होण्यापूर्वी कच्च्या तेलाचे दर ७० डॉलर होते जे आता वाढून १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत.

कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे तेल कंपन्या दबावाखाली होत्या. त्यामुळे कंपन्यांनी तोट्याची भरपाई करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. जर कच्च्या तेलाच्या किमतीत दीर्घकाळ वाढ कायम राहिली तर पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी वाढवल्या जाऊ शकतात.

## मोस्ट वॉण्टेड नायजेरियन अटक; २१ जणांना ठोकल्या बेड्या



**मुंबई/वृत्तसेवा :** डोंबिवलीत पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी मोस्ट वॉन्टेड नायजेरियन ड्रग तस्करांच्या मुसक्या आवळल्या आहेत. एकूण २१ नायजेरियनना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पलावा येथे ही कारवाई करण्यात आली आहे. नवी मुंबई आणि डोंबिवली मानपाडा पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन करत तस्करांना अटक केली आहे. हे सर्व तस्कर नाव बदलून डोंबिवलीच्या पलावा येथे एका आलिशान सोसायटीत राहत होते. पोलिसांनी माहिती मिळाल्यानंतर कोम्बिंग ऑपरेशन करुन त्यांना अटक केली आहे. कोट्यावधींच्या अंमली पदार्थ तस्कारीचा आरोप असलेले मोस्ट वॉन्टेड नायजेरियन यानिमित्ताने जाळ्यात अडकले आहेत. नवी मुंबई आणि डोंबिवली मानपाडा पोलिसांनी मिळून ही कारवाई केली असून, सर्व आरोपींना मानपाडा पोलिस स्टेशन येथे नेण्यात आलं आहे.

## चीनमधील कोळशाच्या खाणीत भीषण स्फोट, ८२ जणांचा मृत्यू



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** चीनच्या उत्तर भागातील शांक्सी प्रांतामधील लिउशेन्यू कोळशाच्या खाणीमध्ये झालेल्या भीषण स्फोटात ८२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर काही कामगार अद्याप खाणीत अडकून पडले आहेत. ही दुर्घटना घडली तेव्हा सुमारे २४७ कामगार जमिनीखाली असलेल्या खाणीत काम करत होते.

चीनमधील शिन्हुआ या वृत्तसंस्थेने दिलेल्या ही दुर्घटना शुक्रवारी संध्याकाळी ७ वाजून २९ मिनिटांच्या सुमारास झाला. रात्रभर सुरू असलेल्या बचाव अभियानादरम्यान, शनिवारी सकाळपर्यंत २०१ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. तर ३८ जण अद्याप खाणीमध्ये अडकलेले आहेत. खाणीत अडकलेल्या मजुरांपैकी काही मजुरांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

**कार्बन मोनॉक्साईड ठरला कारण**

दुर्घटनेबाबत समोर आलेल्या प्राथमिक माहितीनुसार खाणीमध्ये कार्बन मोनॉक्साईडचा स्तर धोकादायक पातळीवर पोहोचला होता. कार्बन मॉनॉक्साईड हा एक विषारी आणि कुठलाही वास नसलेला वायू आहे. त्यामुळे तो ओळखता येत नाही. त्यामुळे खाणीमधील कामगारांसाठी हा विषारी वायू आणखीनच धोकादायक बनला.

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत अंकुर बालविकास केंद्र लातूरचे घवघवीत यश




**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात जालेल्या इयत्ता पाचवी व आतवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये अंकुर बाल विकास केंद्र, लातूरच्या विद्यानने देदिप्यमान आणि अभिमानास्पद यश संपादन करत संस्थेच्या शैक्षणिक परंपरेला पुन्हा एकदा उमाळा दिला साहे विद्याव्यांनी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होत उत्कृष्ट गुणवतेची परंपरा कायम राखली असून संपूर्ण लातूर जिल्ह्यात संस्थेच्या निकालाची मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे

विद्यार्थ्यांच्या या उल यशामुळे संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव, योग्य

नियोजन आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन यांच्या जोरावर विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव तथा मुख्याध्यापक मा व्यंकट दापेगावकर सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थीचे कोतूक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच संस्थेच्या कोषाध्यक्ष सी. विजया गापेगावकर मैडम यांनी विद्यायच्या यशाबद्दल अभिनंदन करत भविष्यातही अशीच यशाची परंपरा कायम ठेवण्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, विद्याथ्यांचे अथक परिश्रम, पालकांचे मोलाचे सहकार्य अंकुर बालविकास केंद्राचे संस्थापक सचिव तथा मुख्याध्यापक मा व्यंकट दापेगावकर सर यांचे प्रभावी नियोजन, सातत्यपूर्ण मार्गदर्शन,

शिक्षकांची अविरत गेहनत तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य यामुळेच हे अभूतपूर्व यश प्राप्त झाले आहे. संस्थेतील प्रत्येक शिशाक विद्याच्या गुणवत्तावाढीसाठी प्रामाणिकपणे मेहका घेत असून विद्याच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. अंकुर बालविकास केंद्र लातूर ही संस्था केवळ निकालापुरती मर्यादित नसून विद्याभ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, स्पर्धात्मकता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जडणघडण करण्याचे कार्य सातत्याने करत आहे दरवर्षीप्रमाणे यंदाही संस्थेच्या विद्याध्योनी शिष्यवृत्ती परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करून संस्थेच्या नावाचा लौकिक अधिक उंचावला आहे.

### प्रभात किरणे

कुणी धर्म प्रेमी,
कोणी जात प्रेमी
कोणी धन प्रेमी,
कोणी पक्ष प्रेमी
अहिंसा सत्य प्रेमी,
जो कर्म प्रेमी
तोच खरा मातृभूमी पुत्र
,देशप्रेमी
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर

## दोन कर्तव्यदक्ष महिला पर्यवेक्षिकांना कारने उडवले

**लातूर/प्रतिनिधी :** तालुक्यात शुक्रवारी (२२ मे) सकाळी शासकीय कामावर असताना एक अत्यंत भीषण अपघाताची घटना घडली आहे. शिरूर अनंतपाळ येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या दोन महिला पर्यवेक्षिका अंगणवाडी केंद्रांना भेटी देण्यासाठी दुचाकीवरून जात असताना, उदगीरहून येणाऱ्या एका भरधाव कारने त्यांना जोरदार धडक दिली. चामरगा पाटीजवळ झालेल्या या भीषण अपघातात मूळच्या बीड जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या एका महिला पर्यवेक्षिकेचा करुण अंत झाला, तर दुसरी महिला गंभीर जखमी झाली आहे. तनुजा घोडके- शिंदे (वय ३२ वर्षे, रा. तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड) असे अपघातात जागीच मृत पावलेल्या कर्तव्यदक्ष पर्यवेक्षिकेचे नाव आहे.

**अंगणवाडी भेटीच्या प्रवासातच काळाचा घाला!**

मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर अनंतपाळ पंचायत समितीच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिका अनुसया खलंग्रे (रा. कवठाळा, ता. चाकूर) आणि तनुजा घोडके- शिंदे या दोन्ही अधिकारी शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे शासकीय कामकाजासाठी बाहेर पडल्या होत्या. तालुक्यातील चामरगा येथील अंगणवाडी केंद्राची पाहणी करून त्या दोघी उदगीर-लातूर महामार्गाने डिगोळ येथील दुसऱ्या अंगणवाडीकडे दुचाकीवरून निघाल्या होत्या. त्यांची दुचाकी चामरगा पाटीजवळ आल्यानंतर, तिथे रस्त्याच्या कडेला थांबलेल्या एका एसटी बसच्या बाजूने त्या पुढे जात होत्या. त्याच वेळी उदगीरच्या दिशेने लातूरकडे अत्यंत भरधाव वेगात जाणाऱ्या एका कारने (क्र. एमएच ५५, बी ०१३९) त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की दोघीही महामार्गावर दूरवर फेकल्या गेल्या आणि गंभीर जखमी झाल्या.

**बीड जिल्ह्यातील मूळ गावी अंत्यसंस्कार; कार जप्त**

अपघातानंतर रस्त्यावरील नागरिक आणि पोलिसांनी तात्काळ दोघींना उपचारासाठी जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती तनुजा घोडके-शिंदे यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. त्यांच्या अकाली निधनाने गेवराई तालुक्यातील तलवाडा परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. शुक्रवारी दुपारी त्यांच्या मूळ गावी तलवाडा येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक लहान मुलगा, सासू-सासरे आणि आई-वडील असा मोठा परिवार आहे. दरम्यान, या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुसऱ्या पर्यवेक्षिका अनुसया खलंग्रे यांच्यावर खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलिसांनी दुर्घटनाग्रस्त कार जप्त केली आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



जुन्या रिक्षांचे राज्यात इलेक्ट्रॉनिक रिक्षात रूपांतर - मंत्री सरनाईक

### चिमटा



दयाचा

लातूरचा उद्योगभवन परिसर हा ट्युशन परिसर कधी बनला हे कळालेच नाही !! आता 'जाग' येवुन काय उपयोग होणार आहे?

## दापका ग्रामपंचायतीत मनरेगा कामात अपहाराचा आरोप

### निलंगा तालुक्यातील दापका ग्रामपंचायतीच्या सरपंचासह संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**निलंगा/मोईज सितारी :** तालुक्यातील दापका ग्रामपंचायत अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत (मनरेगा) मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला असून, संबंधित सरपंच, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व इतर संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून विशेष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भातील सविस्तर निवेदन समस्त दापका ग्रामस्थांच्या वतीने उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आले.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, 'दगडगाव मेन रोड ते काळभैरव मंदिर पानंद रस्ता' या मनरेगा अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व शासन निधीचा अपहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर काम अंदाजे दोन किलोमीटर अंतराचे असून, १८ जुलै २०२४ रोजी मंजूर करण्यात आले होते. या कामासाठी तब्बल ९ लाख ६६ हजार ७३५ रुपयांचा शासन निधी खर्च झाल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले आहे. मात्र प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता बहुतांश ठिकाणी काम झालेलेच नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी यापूर्वीही पंचायत समिती निलंगा तसेच संबंधित कार्यालयांकडे लेखी तक्रारी, छायाचित्रे व पुरावे सादर करण्यात आले होते. मात्र अद्याप कोणतीही प्रभावी चौकशी किंवा कारवाई करण्यात आली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकरणात तात्काळ कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण, तीव्र आंदोलन आणि लोकशाही मार्गाने व्यापक लढा उभारण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी माजी सरपंच शकील पटेल, माजी सदस्य प्रल्हाद भोपी, भागवत तरंगे, धनाजी घाडगे, माजी सदस्य अजित जाधव आदी उपस्थित होते. दरम्यान याबाबत विस्तार अधिकारी यांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहे, असे गटविकास अधिकारी सतीश पाटील यांनी सांगितले.

संपूर्ण प्रकरणाची जिल्हास्तरीय विशेष चौकशी समितीकडून चौकशी करावी, कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून मोजमाप करण्यात यावे, मस्टर, जॉबकार्ड, बँक व्यवहार व छायाचित्रांची फॉरेन्सिक तपासणी करावी, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करावे, अपहार झालेली रक्कम संबंधितांकडून वसूल करावी, चौकशी अहवाल सार्वजनिक करून ग्रामस्थांसमोर जाहीर करावा.




**बनावट मस्टर, जॉबकार्ड दाखवून केला गैरव्यवहार**

निवेदनात म्हटले आहे की, ग्रामपंचायत स्तरावर संगनमत करून बनावट मस्टर तयार करण्यात आले. खोट्या मजुरांची नावे दाखवून जॉबकार्ड तयार करण्यात आले असून, अनेक नावे ही संबंधित पदाधिकाऱ्यांच्या निकटवतीयांची असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले आहे. ग्रामसभांचे खोटे इतिवृत्त, बनावट ठराव, खोट्या स्वाक्षऱ्या आणि बनावट छायाचित्रांच्या आधारे शासनाची दिशाभूल करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून ग्रामपंचायतीत नियमित ग्रामसभा झालेल्याच नसल्याचा आरोप करत, कागदोपत्री ग्रामसभा दाखवून निधी मंजूर करण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वेळीच लक्ष न दिल्याचा परिणाम

राज्यातच काय देशात लातूर शिक्षणाबाबत शंका व्यक्त केली जात आहे. वास्तविक हे कृत्य एका व्यक्तीने पैशाच्या हव्यासापोटी केलेले आहे का अन्य कारणाने हे तपासनंतर कळेल. ही कृती बदनाम कारक आहे यात दुमत नाही. लातूरचा इतिहास जाणून घेवून टिका, टिप्पनी केली पाहिजे. लातूर हे शैक्षणिक केंद्र आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरू नये, त्याच प्रमाणे स्वातंत्र्यपुर्व काळापासून व नंतरही शैक्षणिक कार्य उत्कृष्ठ होते व आहे. निजामाच्या विरोधात लढलेले क्रांतीकारक बहुसंख्य लातूरचे होते. लातूरच्या शैक्षणिक कार्यात तन, मन व धनानी कार्य करणारी मोठी मंडळी होती व काही प्रमाणात आज ही जीवंत आहे. एका चुकीच्या व्यक्तीमुळे आज काही प्रमाणात लातूर बदनाम होत आहे याची कल्पना सर्वांना आहे. वास्तविक याला जबाबदार थंड डोक्यांनी विचार केला तर शासन व प्रशासन आहे असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. एक व्यक्ती, लातूरमध्ये येतो. काही वर्षात शेकडो कोटीची माया जमा करतो. अनेक शैक्षणिक संकुले राज्यात उभा करतो हे दिसून येत नव्हते का? कोणाच्या जोरावर व कोणते असे आर्थिक स्त्रोत आहे की तो मोठी आर्थिक मायाजाल निर्माण करीत होतो हे दिसून येत नव्हते का? कायदा व नियम हे गोरगरीब व जनसामान्यासाठीच आहेत का? असे सर्वांना वाटणे स्वाभाविक आहे. किती माया जमवली. किती प्रसिद्धी करून घेत होते. किती जणास विकत घेतले. याकडे दुर्लक्ष केल्याचा हा परिणाम म्हणजे लातूर बदनाम होण्यास मदत होत आहे हे दुःखाने नमुद करावे वाटते. एका दिवसात, अल्पावधित अफाट माया कशा प्रकारे जमवु शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. आज हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्याची माती झाली आहे. याला जबाबदार कोणाला धरणार? किती दिवसापासून तो वाईट काम चालू होते याचा अंदाज आला असेल. त्यामुळे चुकीच्या व्यक्ती एक ना एक दिवस जनतेसमोर येतो. हे लक्षात घेतले पाहिजे. पैसा कमवा. आर्थिकधन कमविण्यात मर्यादा नाहीत, मात्र धन कमवितांना एक बाब लक्षात ठेवली पाहिजे, धन हे पवित्र मार्गाने कमविले पाहिजे. शास्त्रही हेच सांगते. गरजू, गोरगरीबांना त्यातील वाटा वाटला पाहिजे. दानधर्म केला पाहिजे. या व्यक्तीने ज्यांच्याकडे धन अफाट आहे त्यालाच मदत केली आहे. आता कोणाला मदत केली हे सर्वांना माहिती आहे. आपले पाप झाकण्यासाठी काय-काय केले हे आता कळून आले आहे. जेवढे कमविले त्यापैकी किती राहाते त्यापेक्षाही आपण जेवढी प्रसिद्धी व लोकप्रियता कमविली ती धुळीस मिळली आहे. तेच काम जर प्रामाणिक केले असते तर घराघरात फोटो लावले असते, दैवत मानले असते. माणसाला चुकीच्या मार्गाने धन आले की, चांगले काही दिसून येत नाही तसेच या साहेबांचे झाले असावे. किती मगरूर होता हे अनेकांना माहिती. गोरगरीब, साधाव्यक्ती गेला तर आपमान करीत होता. एवढा पैशाच्या जोरावर माज आला होता. असे असताना काही व्यक्तीकडून सुरवातीला त्याची प्रशांसा होत होती. त्यामुळे वाईट वाटते. स्वार्थ तर सर्वांना आहे. स्वार्थापोटी चुकीच्या व्यक्तीला साथ देणे चुकीचे आहे. त्यामुळे चुकीची बाब एक ना एक दिवस उघडे पडते. त्याच प्रमाणे किती आर्थिक मायाजालात आडकावयाचे? ज्यावेळी ईडी या बाबत लक्ष देईल. त्यावेळी आर्थिक आकडे बाहेर येतील त्यावेळी अनेकांना कळून येईल. सुदैवाने किंवा दुर्दैवाने पापाचा घडा भरल्यावर उघडे पडला गेला. वास्तविक एवढी माया जमवित असताना देशातील काही यंत्रणा आहे का नाही, जे लक्ष देत असते. देशात आर्थिकबाबीची तपासणी करणारी यंत्रणा आहे का नाही? अशा विविध यंत्रणेला पाहाण्यासाठी डोळे नव्हते का? जेवढा मोठी माया जमविणारा गुन्हेगार समजला जातो तेवढेच इतरही दुर्लक्ष करणारे समजले पाहिजेत. त्याना ही शिक्षा अपेक्षित आहे. त्यामुळे एकाला टार्गेट होण्याबरोबर इतरांना सोडणे योग्य नाही. हे अजूनही लक्षात येत नाही, हे मोठे दुर्दैव आहे. लातूर आज बदनाम होत आहे, तरी परिस्थिती जाणून घेतली पाहिजे. एक ना एक दिवस लातूरची पोरच काय लातूरचे देवणीचा गुरे सुद्धा नंबरवनच आहेत हे लक्षात येणार आहे. लातूरची शैक्षणिक पॅटर्न अनेक काळापासूनचे आहे. लातूरचे शाहू, दयानंद, म. बसवेश्वर व इतर महाविद्यायातून अनेक विद्यार्थीचे सोने झाले आहे. या लायक नसलेल्या व्यक्तीच्या अगोदर लातूरचे नाव शैक्षणिक क्षेत्रात झळकले आहे. देशिकेंद्र असो, मारवाडी राजस्थान किंवा केशवराज असे इतर अनेक अशा शैक्षणिक संस्थेत गुणवत्ता धारक विद्यार्थी निर्माण झाले व होतात. पुर्वीही व आताची झळकत आहेत. याने आपल्या ट्युशन क्लासेस नाव लावुन मोठी प्रसिद्धि मिळविली आयत्या पिठावर रेघा मारल्या आहेत. हे लातूरकरांना माहिती आहे. त्याच्याकडे मोठी अॅक्शन व वेड्यात काढण्याची कला होती त्यावर तो यशस्वी झाला असेल. गुरु कोणाला म्हणायाचे हे पहिल्यांदा लक्षात घेतले पाहिजे. चुकीच्या व्यक्तीला काहींनी साथ दिली तेच चुकीचे ठरले. त्यांना काय माहिती हा चुकीचा व्यक्ती आहे. मात्र तो कसा कमवितो आहे. आपल्यापेक्षा अधिक धन साठवत आहे याची तरी कल्पना असली पाहिजे होती. मुळात लातूर हे मुळात शैक्षणिक सोन्याची खाण आहे. येथील पुरातन शैक्षणिक संस्था अजूनही चांगले, गुणवत्ताधारक विद्यार्थी निर्माण केल्या आहेत व सध्याला करीत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. शाहु, दयानंद व म. बसवेश्वर आदि महाविद्यायाने अनेक विद्यार्थी निर्माण केले आहेत. हा आता दिड दिवसात पॅटर्न निर्माण करणारा आला व त्याने लातूरची बदनामी केली आहे. त्याला ईश्वर माफ करेल असे वाटत नाही. चुकीचे काम करणाऱ्यास शिक्षा होतेच, त्याच प्रमाणे चुकीच्या व्यक्तीला साथ देणारे सुद्धा तेवढेच शिक्षेस पात्र समजले जातात. ईश्वरीय न्याय वेगळा आहे. हे लक्षात घेता इतरांनी काही धडा घेण्याचे काम करावे. वास्तविक तो कसा आहे. कसे धन कमवितो आहे. किती कमवितो आहे. आपले पाप झाकण्यासाठी किती वाटप करतो आहे याची माहिती ठराविकांना असली पाहिजे. त्यामुळे चुकीच्या कामाला शिक्षा असते हे अनेकांना कळून आले असेल. त्यामुळे योग्य व पवित्र धन कमविले पाहिजे. धन कमविण्यात मर्यादा नाही मात्र ते पवित्र मार्गाने आले पाहिजे. पापी लक्ष्मी ज्यावेळी उद्योग, व्यवसायात, घरी येते त्यावेळी असेच होते हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. आता तपास चालू आहे. यदाकदाचित निर्दोष सुटतील मात्र झालेली बदनामीचे काय? त्यापेक्षा वेळीच लक्ष न दिल्याचा हा परिणाम आहे तेही तेवढेच दोषी समजले पाहिजेत.

# मोदींनी मेलोनींना 'मेलॉडी' टॉफी देताच 'भलत्याच' कंपनीचे नशीब चमकले

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलॉनी यांना 'मेलॉडी'टॉफी भेट म्हणून दिल्यानंतर शेअर बाजारात एका वेगळ्याच आणि रंजक घडामोडीची नोंद झाली. वास्तविक पा-हता, 'मेलॉडी' ही टॉफी 'पार्ले प्रॉडक्ट्स' या नामांकित कंपनीद्वारे तयार केली जाते. ही मूळ कंपनी भारतीय शेअर बाजारात सूचिबद्ध नाही. मात्र, केवळ नावातील साधर्म्यामुळे गुंतवणूकदारांचा गैरसमज झाला आणि त्यांनी 'पार्ले इंडस्ट्रिज' या भलत्याच कंपनीचे शेअर्स खरेदी करण्यासाठी एकच गर्दी केली. परिणामी, या कंपनीच्या शेअर्सना अचानक अप्पर सर्किट लागले.

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलॉनी यांनी बुधवारी (दि. २०) सकाळी त्यांच्या अधिकृत 'द' अकाऊंटवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबतचा एक हलका-फुलका व्हिडिओ शेअर केला. या व्हिडिओला त्यांनी भेटवस्तूसाठी धन्यवाद असे कॅप्शन दिले होते. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आणि त्यानंतर 'मेलॉडी' टॉफीची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू झाली. इंटरनेटवर ही चर्चा रंगत अस-तानाच, शेअर बाजारातील गुंतवणूकदारांनी घाईघाईत या नावाशी मिळतीजुळती कंपनी शोधण्यास सुरुवात केली.

**पार्ले इंडस्ट्रिजच्या शेअर्समध्ये मोठी उसळी**

या वाढत्या चर्चेचा थेट फायदा 'पार्ले इंडस्ट्रिज' या पेनी स्टॉक असलेल्या कंपनीला झाला. अवघ्या ५ रुपये किमतीचा हा शेअर २० मे रोजी 'मेलॉडी'च्या बातमीनंतर ५ टक्क्यांच्या अप्पर सर्किटसह ५.२५ रुपयांवर पोहोचला. उपलब्ध आकडेवारीनुसार, या कंपनीच्या शेअरची ५२ आठवड्यांची सर्वोच्च पातळी १७.४४ रुपये, तर नीचांकी पातळी ४.११ रुपये आहे. सध्या या कंपनीचे एकूण बाजार भांडवल सुमारे २५.६४ कोटी रुपये आहे.

गुंतवणुकीचा आलेख पाहिल्यास, या कंपनीच्या शेअरने गेल्या एका आठवड्यात गुंतवणूकदारांना ५.६३ टक्के परतावा दिला आहे, तर गेल्या एका महिन्यात त्यात ३.९६ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे. मात्र, गेल्या तीन महिन्यांचा विचार केला तर या शेअरमध्ये सुमारे ३५.०२ टक्क्यांची घसरण झाली होती.

**'मेलॉडी' आणि 'पार्ले इंडस्ट्रिज'चा कोणताही संबंध नाही**

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाची आणि तांत्रिक बाब म्हणजे, ज्या 'मेलॉडी' टॉफीमुळे ही तेजी आली, तिचा पार्ले इंडस्ट्रिजशी दूरवरचाही संबंध नाही. 'मेलॉडी' आणि 'पार्ले-जी' सारखे सुप्रसिद्ध ब्रँड हे 'पार्ले प्रॉडक्ट्स' या




खासगी कंपनीच्या मालकीचे आ-हेत. याउलट, शेअर बाजारात सूचिबद्ध असलेल्या 'पार्ले इंडस्ट्रिज' या कंपनीचा मुख्य व्यवसाय पायाभूत सुविधा, रिअल इस्टेट आणि कागदी कचरा पुनर्चक्रण या क्षेत्रांशी संबंधित आहे. केवळ 'पार्ले' या नावातील साधर्म्यामुळे गुंतवणूकदारांनी या कंपनीत मोठ्या प्रमाणावर खरेदी केल्याचे स्पष्ट झाले आहे.

# ग्लुकोज पातळी आणि मेंदूचे आरोग्य: डॉ. वसुंधरा अग्रवाल




रक्तातील ग्लुकोज कमी झाल्यावर त्याचा थेट परिणाम मेंदूवर होतो. कारण, मेंदूला ऊर्जेसाठी प्रामुख्याने ग्लुकोजची गरज असते आणि मेंदू स्वतः ग्लुकोज साठवून ठेवू शकत नाही.

मानवी मेंदूचे वजन शरीराच्या एकूण वजनाच्या केवळ दोन टक्के असले, तरी शरीरातील एकूण ग्लुकोजच्या पुरवठ्यापैकी सुमारे वीस टक्के भाग मेंदू वापरतो. न्यूयॉर्क अॅकॅडमी ऑफ सायन्सेसच्या एका संशोधनानुसार, चेतापेशींच्या कार्यासाठी ग्लुकोज अत्यंत आवश्यक असते. शरीरातील साखरेची पातळी थोडी जरी खालावली, तरी मेंदूच्या कामावर परिणाम होऊन चिडचिड, गोंधळलेली अवस्था किंवा बोलताना शब्द अडखळणे अशा समस्या सुरू होतात. स्नायू किंवा यकृताप्रमाणे मेंदूकडे साखरेचा राखीव साठा नसल्याने तो या बदलांबाबत अत्यंत संवेदनशील असतो.

कमी रक्तशर्करा असलेल्या रुग्णांमध्ये सुरुवातीला अशक्तपणा, जास्त घाम येणे, अचानक भूक लागणे आणि हृदयाचे ठोके वाढणे अशी लक्षणे दिसतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास दृष्टी धूसर होणे, डोकेदुखी आणि एकाग्रता साधण्यास अडचण येणे असे त्रास उद्भवतात. गंभीर परिस्थितीत फिटस् येणे किंवा बेशुद्ध पडण्याची शक्यता असते. अशा वेळी तातडीने वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक ठरते.

वेळेवर जेवण न घेणे हे हायपोग्लायसेमियाचे सर्वात मुख्य कारण आहे. याशिवाय अतिप्रमाणात रिफाईंड कार्बोहायड्रेटस्चे सेवन केल्याने साखर एकदम वाढून पुन्हा झपाट्याने कमी होते. मधुमेही व्यक्तींमध्ये इन्सुलिनच्या चुकीच्या प्रमाणामुळे हा त्रास होऊ शकतो. मात्र, तणाव, अपुरी झोप किंवा विशिष्ट आजारांमुळे मधुमेही नसलेल्या व्यक्तींनाही रक्तातील साखर कमी होण्याचा त्रास होऊ शकतो.

रक्तातील साखर कमी झाल्याचे जाणवले, तर त्वरित १५ ग्रॅम ग्लुकोज पावडर, फळांचा रस किंवा साखर खाणे फायदेशीर ठरते. रक्तातील साखर स्थिर झाल्यावर प्रथिने आणि कर्बोदकेयुक्त आहार घ्यावा. हा त्रास टाळण्यासाठी दर तीन ते चार तासांनी संतुलित आहार घेणे, आहारात फायबर आणि निरोगी चरबीचा समावेश करणे आवश्यक आहे. अल्कोहोलचे सेवन मर्यादित ठेवावे आणि पुरेशी झोप तसेच तणावमुक्त जीवनशैलीचा अवलंब करावा. वारंवार असा त्रास होत असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने रक्तातील साखरेची तपासणी करून घेणे हिताचे ठरते.

# 'कमी साखर' ही धोक्याचीच! अस्वस्थता आणि चक्कर येण्याकडे दुर्लक्ष करू नका



डायबेटीस म्हणजे मधुमेह आपल्या देशात एक सर्वसामान्य आजार आहे. आपल्या देशातील दर पाच व्यक्तींमध्ये एक व्यक्ती मधुमेहाचा रुग्ण असतो. मधुमेह म्हणजे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढणे. मधुमेहाच्या भीतीने अनेक जण साखर किंवा गोड पदार्थ खायचे टाळतात आणि मग अशी वेळ येते की, त्यांच्या रक्तातील साखरेचे प्रमाणच कमी होऊन जाते. रक्तातील साखरेचे प्रमाण वाढणे जसे धोक्याचे असते, तसेच ते कमी होणेही तितकेच धोक्याचे असते.

रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होणे धोक्याचे असते. मधुमेहाच्या रुग्णांमध्ये असा धोका निर्माण होण्याची जास्त शक्यता असते; पण निरोगी व्यक्तींमध्येही हा धोका असतो. साखर किंवा ग्लुकोज आपल्या शरीरात उर्जा निर्माण करण्याचा मुख्य स्रोत आहे. ही साखर रक्ताच्या माध्यमातून आपल्या शरीरातील सर्व इंद्रियांपर्यंत पोहोचते म्हणजे रक्तातील साखर आपल्या शरीराची मूलभूत गरज आहे. साखर कमी होण्याच्या स्थितीला हायपोग्लायसेमिया असे म्हणतात. या स्थितीत किडनीची समस्या, हेपेटायटिस, यकृताचे विकार, मानसिक संतुलन बिघडणे, अस्वस्थता, चक्कर येणे अशासारख्या अनेक समस्या निर्माण होतात.

**लक्षणे कोणती?**

पोटभर जेवण झाल्यानंतरही आपले पोट रिकामे आहे असे वाटणे किंवा कडकडून भूक लागणे हे आपल्या शरीराला आणखी ग्लुकोजची आवश्यकता आहे, याचे लक्षण आहे.

हायपोग्लायसेमिया हे निद्रानाशाचेही कारण असू शकते. रात्री घाम येत असेल, स्वप्ने पडत असतील किंवा अस्वस्थ वाटत असेल, तर हे रक्तातील साखर कमी झाल्याचे लक्षण आहे.

अचानक मूड बदलणे हे रक्तातील साखर कमी झाल्याचे लक्षण असू शकते. आपल्या वर्तनात अचानक काहीतरी बदल झाला आहे, असे तुम्हाला जाणवले किंवा तुम्ही अस्वस्थ राहू लागलात, तर हे ग्लुकोज कमी होण्याचे लक्षण असू शकते.

शरीरातील साखर कमी होण्याचे हे सर्वात पहिले आणि नेहमीचे लक्षण आहे. अनेकदा तुम्ही बराच वेळ उपाशी असाल आणि शरीरातील ग्लुकोजचे प्रमाण कमी झाले, तर तुम्हाला चक्कर येऊ लागते किंवा डोळ्यांसमोर अंधारी येते.

काही वेळा मधुमेहाच्या काही औषधांनीही रक्तातील साखर कमी होते. म्हणूनच ही औषधे घेताना त्यातील कोणती औषधे लो ब्लड शुगरशी निगडीत आहेत, हे डॉक्टरांना विचारणे आवश्यक असते.

तुम्ही इन्सुलिन जास्त प्रमाणात घेत असाल, तर रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने कमी होऊ शकते.

**काय करावे?**

तुम्हाला मधुमेह असेल आणि तुम्हाला आपल्या शरीरातील साखर कमी झाली आहे, असे वाटत असेल, तर आधी रक्तातील साखरेचे प्रमाण तपासून घ्या. रक्तातील साखरेचे प्रमाण कमी झाल्यास सर्वात प्रथम जलद गतीने सक्रिय होणारे कार्बोहायड्रेटस् किमान १५ ग्रॅम या प्रमाणात खा किंवा प्या. तीन ते चार ग्लुकोज टॅब्लेटस्, ग्लुकोज जेलची एक ट्यूब, चार ते सहा गोड लिमलेटसारख्या गोळ्या ( शुगर फ्री नाही), अर्धा कप फळांचा रस, अर्धा कप स्कीम दूध, एक चमचा मध (हा मध जिभेखाली ठेवा, इथे ठेवल्याने मध वेगाने रक्तप्रवाहात मिसळतो.) हायपोग्लायसेमियाची लक्षणे दिसत असतील, तर अशा स्थितीत वाहन चालवू नका. रक्तातील साखर कमी होणे याकडे फारसे लक्ष दिले जात नाही; पण याकडे वेळीच लक्ष दिले नाही, तर ते धोकादायक ठरते

# डिहायड्रेशन ओळखायचे कसे?



भारतीय हवामान विभागाने देशातील अनेक राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. वाढत्या तापमानासोबतच हवेतील आर्द्रता वाढल्यास शरीरातील घाम सुकण्याचे प्रमाण कमी होते. यामुळे शरीराची नैसर्गिक शीतकरण यंत्रणा कोलमडू शकते.

निर्जलीकरण किंवा डिहायड्रेशन म्हणजे केवळ तहान लागणे नाही. हे शरीरातील द्रव्यांचे एक क्लिनिकल असंतुलन आहे. याचे रूपांतर काही तासांतच उष्माघातात होऊ शकते. आपण केवळ उष्णतेने त्रस्त आहोत की, शरीरातील पाणी धोकादायक पातळीपर्यंत कमी झाले आहे, हे ओळखण्यासाठी काही घरगुती चाचण्या उपयुक्त ठरू शकतात.

त्वचेची लवचिकता थेट शरीरातील पाण्याच्या प्रमाणाशी संबंधित असते. पिंच टेस्ट ही चाचणी करण्यासाठी हाताच्या मागील बाजूची किंवा खालच्या हाताची त्वचा दोन बोटांनी काही सेकंद जोरात चिमटीत पकडा आणि नंतर सोडून द्या. शरीर व्यवस्थित हायड्रेटेड असेल, तर त्वचा त्वरित आपल्या मूळ स्थितीत परत येते. मात्र, यासाठी वेळ लागत असेल किंवा ती तशीच उभी राहत असेल, तर ते मध्यम ते तीव्र स्वरूपाच्या निर्जलीकरणाचे लक्षण आहे.

रक्ताभिसरण आणि पाण्याचे प्रमाण तपासण्यासाठी कॅपिलरी रिफिल टेस्ट ही चाचणी क्लिनिकल क्षेत्रात वापरली जाते. आपला हात हृदयाच्या पातळीच्या वर धरा आणि एका नखावर पांढरे होईपर्यंत जोरात दाब द्या. दाब काढून टाकल्यावर जर नखाचा गुलाबी रंग परत येण्यासाठी दोन सेकंदांपेक्षा जास्त वेळ लागला, तर रक्तातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे रक्ताभिसरण मंदावले असल्याचे ते निदर्शक आहे.

यकृत आणि मूत्रपिंड शरीरातील पाण्याचे नियमन करतात. शरीरात पाणी कमी असल्यास मूत्रपिंड ते वाचवण्याचा प्रयत्न करतात. यामुळे लघवी अधिक गडद रंगाची होते. लघवीचा रंग फिकट पिवळा किंवा लिंबाच्या रंगासारखा असेल, तर तुम्ही सुरक्षित आहात. मात्र, तो सफरचंदाच्या रसासारखा गडद पिवळा असेल, तर लगेच पाणी पिणे आवश्यक आहे. हा रंग गडद नारंगी किंवा तपकिरी असल्यास ती वैद्यकीय आणीबाणी असूनख मूत्रपिंडावर ताण येत असल्याचे लक्षण आहे.

वृद्ध व्यक्तींमध्ये अनेकदा तहान लागल्याची जाणीव उशिरा होते, अशा वेळी तोंडातील ओलसरपणा तपासणे महत्त्वाचे ठरते. आपली जीभ दातांवरून आणि टाळूवरून फिरवा. तोंडातून लाळ निसरडी आणि ओली वाटणे हे आरोग्याचे लक्षण आहे. लाळ चिकट वाटत असेल किंवा जीभ कोरडी पडली असेल, तर शरीर महत्त्वाच्या अवयवांचे संरक्षण करण्यासाठी लाळ ग्रंथींमधील पाणी वळवत असल्याचे हे चिन्ह आहे.

निर्जलीकरणामुळे उरलेले रक्त शरीरात फिरवण्यासाठी हृदयाला अधिक वेगाने काम करावे लागते. एक मिनिट झोपलेल्या अवस्थेत स्वतःची नाडी तपासा आणि नंतर लगेच उभे राहून पुन्हा नाडी तपासा. हृदयाचे ठोके प्रतिमिनिट १५ ते २० पेक्षा जास्त वाढले असतील, तर शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याचे हे संकेत आहेत. उभे राहिल्यावर चक्कर येणे हे देखील याच स्थितीचे लक्षण आहे.

या घरगुती चाचण्या केवळ प्राथमिक निदानासाठी आहेत. एखाद्या व्यक्तीला ग्लानी येणे, १०२ अंशांपेक्षा जास्त ताप असणे किंवा पाणी पिणे अशक्य होणे असा त्रास होत असेल, तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# रोजची कंबरदुखी



वय जसं वाढतं, तसा कंबरदुखीचा त्रास अनेकींना जाणवू लागतो. काही जणींमध्ये हे दुखणं इतकं त्रासदायक असतं की रोजच्या कामासोबतच उठणं, झोपणं या शरीराच्या साध्या हालचालीही अवघड बनतात. पण आपण नियमित व्यायाम करून पोटावर असलेली अनावश्यक चरबी कमी केल्यास त्याचा परिणाम लगेच कंबरदुखीवरही जाणवू शकतो.

पोटाचे आणि कंबरेचे काही खास व्यायाम प्रकार आहेत, ते केल्यास नक्कीच फायदा मिळतो. पोटाचे व्यायाम पोटाच्या स्नायूंसाठी करतात. पोटाचे व्यायाम करण्याआधी पाणी पिऊ नये. त्यामुळे पोट दुखण्याची शक्यता जास्त असते. पोटावरील चरबी कमी करून पोट कमी करण्याआधी पाठ मजबूत होणं आवश्यक आहे. ज्यांना पाठदुखीचा त्रास आहे. त्यांनी हे व्यायाम करण्याआधी स्ट्रेचेस केले आणि नंतर हे व्यायाम केले तर व्यायामाचे परिणाम चांगले होतात.

**व्यायाम :** आधी जमिनीवर ताठ झोपावं. पाय गुडघ्यात वाकवावे. पाठ आणि नितंब जमिनीला टेकलेले असले पाहिजे. दोन्ही हात डोक्याखाली ठेवायचे. हनुवटी छातीला टेकावी. नजर छताकडे ठेवावी. पाठीचा वरचा भाग उचलला जाईल इतपत उठायचं आणि परत टेकायचं. टेकताना फक्त खांदे जमिनीला टेकतील. मान खाली टेकवायची नाही. उठताना पोटाच्या स्नायूंची मदत आणि ताकद घ्यायची असते. उठताना श्वास सोडायचा आणि टेकताना श्वास घ्यायचा. उठताना सामान्य गतीनं उठावं आणि टेकताना त्याहीपेक्षा हळू टेकावं. हा व्यायाम करताना मानेला झटका बसायला नको. दहा ते पंधरा रिपिटेशनचा एक सेट याप्रमाणे तीन सेटमध्ये हा व्यायाम करावा. सुरुवातीला एक सेट करावा. सवयीनं तीन सेट जमतात. क्रंचेस करताना श्वासोच्छ्वास नियमित घ्यायचाय. पण तो एका रिदममध्ये घ्यायचा आहे. व्यायाम करताना कंबरेवर ताण जाणवल्यास व्यायाम थांबवावा. ज्यांना स्पॉन्डिलेसिस, कंबरदुखीचा त्रास आहे, त्यांनी हा व्यायाम करू नये. हा व्यायाम खास पोटाच्या स्नायूंसाठी असून, तो नियमित केल्यास पोटावरची चरबी कमी होते.

## दिलासा देणारे

थकलेली माणसे : विजय तरवडे

निसर्गसौंदर्याची देणगी लाभलेल्या केरळला 'देवभूमी' म्हणतात, हे ठाऊक होते. पण, परवा आंतरजालावर सहज काही शोधताना लक्षात आले की, ज्येष्ठ नागरिकांसाठी देखील केरळ हा देवलोक आहे. आपल्याकडे ज्येष्ठ नागरिकांसाठी रुग्णालयात उपचार घेताना महात्मा फुले योजना आहे किंवा बस प्रवासात सवलती आहेत. तीर्थयात्रेसाठी सवलती आहेत. शिवाय केंद्र सरकारच्या काही कल्याणकारी योजना आहेत. अनेकदा या योजनांची माहिती नसल्यामुळे त्यांच्या लाभांपासून ज्येष्ठ नागरिक वंचित राहतात. उदाहरणार्थ, एसटी महामंडळाची सवलत घेण्यासाठी एसटीचे 'स्मार्ट कार्ड' घ्यावे लागेल, अशी नवी तरतूद करण्यात आली आहे. हे स्मार्ट कार्ड घेणे ज्येष्ठ नागरिकांना सहजी शक्य नाही. त्यांनी कुटुंबातील तरुण तंत्रज्ञान स्नेही व्यक्तींची किंवा आपल्या प्रभागातील निःस्वार्थी कार्यकर्त्यांची मदत घेऊन कार्ड काढणे गरजेचे आहे. केरळमध्ये देखील ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देणार्या काही गोष्टी आढळल्या. राज्याच्या अंदाजपत्रकातली १९ टक्के रक्कम ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव आहे. मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी तिथे 'गेरियाट्रिक मेंटल हेल्थ अँड कॉग्निटिव्ह रिहॅबिलेशन'ची स्थापना झाली आहे. 'वयोअमृतम्' प्रकल्पाद्वारे शासकीय वृद्धाश्रमात राहणार्या ज्येष्ठांसाठी आयुर्वेदिक उपचार उपलब्ध आहेत. आरोग्यविम्यात दातांवरील उपचारांचे पैसे मिळत नाहीत. पण, केरळमध्ये एका योजनेतून ज्येष्ठांना मोफत दंतसंच (कवळी) बसवून मिळते. दारिद्र्यरेषेखालील मधुमेही ज्येष्ठांना 'वयोमधुरम्' प्रकल्पाद्वारे शर्करा तपासणीसाठी मोफत ग्लुकोमीटर दिले आहेत. २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात 'सायंप्रभा' योजनेसाठी १४०० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. राज्याच्या अंदाजपत्रकात ज्येष्ठांसाठी असलेल्या विविध योजनांसाठी ४६२३६ कोटी



रुपयांची तरतूद केली आहे. ही रक्कम एकूण अंदाजपत्रकाच्या १९ टक्क्यांहून अधिक आहे. केरळ सरकारने यंदा ज्येष्ठांसाठी केलेल्या काही उल्लेखनीय गोष्टी - वयोजन आयोग : ज्येष्ठांच्या हक्कांचे रक्षण करणे, दुर्लक्षित ज्येष्ठांचे पुनर्वसन, आणि त्यांचे शोषणापासून रक्षण करण्यासाठी स्थापन केलेला हा देशातला पहिला वैधानिक आयोग आहे. हेल्थ केअर : मनोविकारांवरील उपचारांसाठी मनोरुग्णालये, टेलिमेडिसिनची सुविधा. ज्येष्ठांना विविध अडचणीत एकाच ठिकाणी सर्व आपत्कालीन सुविधा मिळण्याची सोय. विविध क्षेत्रातील व्यक्तींना परवडणार्या दारात आरोग्यविमाः-अनेक आजारात रुग्ण बिछान्याला दीर्घकाळ खिळून राहतो. अशावेळी त्याची शुश्रूषा, कपडे बदलणे वगैरेसाठी केअरटेकर किंवा परिचारकाची गरज भासते. या केअरटेकर्सना विशेष प्रशिक्षण देण्याची तरतूद.आयुष्यात एकाकी पडलेल्या कलाकारांसाठी 'आर्ट व्हिलेज' किंवा 'अभय केंद्र' उभारण्याची योजना. वरील तरतुदी केरळमधील नवे सरकार देखील चालू ठेवील, अशी आशा आहे.या सर्व तरतुदी वाचल्यावर एक विचार मनात येतो- दातांवरील उपचारांचा एक भाग म्हणून मोफत कवळी किंवा रक्तशर्करा तपासण्यासाठी मोफत ग्लुकोमीटर योजना सरकारने आखली आहे. मात्र, ग्लुकोमीटरबरोबर वापरण्यासाठी लागणार्या पट्ट्या अतिशय महाग असतात. जेनेरिक औषधांप्रमाणे त्या थोड्या स्वस्तात उपलब्ध झाल्या तर बरे. इथून पुढच्या काळात अशाच आणखीन एका तरतुदीची आवश्यकता आहे. अनेकदा अतिज्येष्ठ रुग्ण दीर्घकाळ किंवा 'अगदी शेवटपर्यंत' बिछान्याला खिळून असतो. त्यांचे रोज कपडे बदलणे, स्वच्छता करणे, डायपर्स बदलणे, वेळेवर जेवू घालणे, औषधे देणे हे जिकीरीचे काम आहे. अशा रुग्णाची मुले-मुली देखील साठीची असतात. त्यांना ही कामे झेपतातच असे नाही आणि केअरटेकर ठेवणे खर्चिक असते. गरीब किंवा मध्यमवर्गीय कुटुंबाचे देखील त्यात कंबरडे मोडू शकते. कोणत्याही विमा कंपनीच्या आरोग्यविम्यात या खर्चाची तरतूद नाही. अनेक ठिकाणी सेवाभावी संस्था या सेवा अल्प दरात किंवा मोफत देण्याचा प्रयत्न करतात. पण, त्यांची शक्ती क्षीण पडते. राज्य सरकारे किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यासाठी काही करू शकतील का? अंगणवाडी कर्मचारी, किंवा ट्रॅफिक वॉर्डनच्या धर्तीवर माफक प्रशिक्षण देऊन केअरटेकर्सची छोटी फळी उभी झाली तर, गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना माफक दरात ही सेवा उपलब्ध करता येईल, असे वाटते.

## घराचे स्वप्न आणखी महाग




सिमेंटच्या प्रत्येक पोत्यामागे दहा रुपयांपासून २५ रुपयांपर्यंत दरवाढ करण्यात आली आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यातही सुमारे १० रुपये प्रति गोण दरवाढ झाली होती. म्हणजेच एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत सिमेंटचे दर पुन्हा वाढले आहेत. ही दरवाढ संपूर्ण देशात सारखी असणार नाही. वेगवेगळ्या भागांमध्ये वाढीचे प्रमाण वेगळे असेल. दक्षिण भारतात सर्वाधिक म्हणजे जवळपास २५ रुपये दरवाढ होण्याची शक्यता आहे. पूर्व भारतात २५ ते ३० रुपये प्रति पोते वाढ होऊ शकते, तर उत्तर आणि पश्चिम भारतात सिमेंटचे दर १० ते १५ रुपये प्रति पोते वाढू शकतात. सिमेंट महाग होण्यामागे मुख्यतः दोन मोठी कारणे सांगितली जात आहेत. पहिले कारण म्हणजे पश्चिम आशियामध्ये सुरू असलेला तणाव. या परिस्थितीमुळे कच्च्या मालाचा पुरवठा, वाहतूक आणि लॉजिस्टिक्स खर्च वाढले आहेत. त्यामुळे सिमेंट कंपन्यांवरील उत्पादन खर्चाचा दबाव वाढला आहे. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे इनपुट कॉस्टमध्ये झालेली मोठी वाढ. सिमेंटच्या पोत्यांसाठी वापरल्या जाणार्या पॉलीप्रॉपिलीन या कच्च्या मालाच्या किमतीत तब्बल ७० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. त्यामुळे पॅकेजिंग खर्च खूप वाढला आहे. याशिवाय वाहतूक आणि लॉजिस्टिक्स खर्चातही १० ते १५ टक्क्यांची वाढ झाली आहे. सिमेंट उद्योगात एकूण खर्चामध्ये लॉजिस्टिक्सचा हिस्सा सुमारे २० ते २५ टक्के असतो. त्यामुळे वाहतूक खर्च वाढल्याचा थेट परिणाम सिमेंटच्या अंतिम किमतीवर होत आहे. या दरवाढीचा थेट परिणाम बांधकाम आणि रिअल इस्टेट क्षेत्रावर होणार आहे. घर बांधण्याच्या एकूण खर्चात सिमेंटचा वाटा साधारणपणे १८ ते २२ टक्के असतो. त्यामुळे सिमेंट महाग झाल्यास घरबांधणीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. बिल्डर्स आणि डेव्हलपर्ससाठी प्रकल्प खर्च वाढणार असल्याने भविष्यात घरांच्या किमतींवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. पायाभूत क्षेत्रालाही या वाढीचा मोठा फटका बसू शकतो. रस्ते, पूल, धरणे आणि मोठ्या सरकारी प्रकल्पांमध्ये सिमेंटचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. अनेक प्रकल्पांमध्ये सिमेंटचा वापर ८० ते ९० टक्क्यांपर्यंत असतो. त्यामुळे भविष्यात पायाभूत सुविधा प्रकल्पांचा खर्चही वाढू शकतो. दरम्यान, शेअर बाजारातही सिमेंट कंपन्यांच्या शेअर्सवर दबाव दिसून आला आहे.

अल्ट्राटेक सिमेंट, अंबुजा सिमेंट, दालमिया भारत आणि जेके सिमेंट यांसारख्या प्रमुख कंपन्यांचे शेअर्स घसरले, तर श्री सिमेंटमध्ये काही प्रमाणात वाढ दिसून आली. विश्लेषकांच्या मते, कंपन्यांनी दर वाढवले असले, तरी त्यांना वाढलेला संपूर्ण खर्च ग्राहकांकडून वसूल करणे कठीण जाऊ शकते. कारण सध्या बांधकाम क्षेत्रातील मागणी अपेक्षेइतकी मजबूत नाही. त्यामुळे कंपन्यांच्या नफ्यावर दबाव राहण्याची शक्यता आहे.

## गणित सोपे करण्यासाठी तुमच्यासाठी काही महत्वाच्या टिप्स

गणिताचा सराव सोपा करण्यासाठी येथे काही महत्त्वाच्या टिप्स दिल्या आहेत:१. मूळ संकल्पना समजून घ्या गणितातील सूत्रे पाठांतर करण्याऐवजी ती कशी तयार झाली, हे समजून घ्या. बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार या मूलभूत क्रिया पक्क्या करा.२. रोज सराव करा गणित हा वाचण्याचा विषय नाही, तर तो करून पाहण्याचा विषय आहे. रोज किमान ३० ते ४० मिनिटे गणिताचा सराव करा.३. पाढे आणि वर्गमूळे पाठ करा: १ ते ३० पर्यंतचे पाढे, १ ते २० पर्यंतचे वर्ग आणि १ ते १० पर्यंतचे घन तोंडपाठ करा. यामुळे प्रश्न सोडवण्याचा वेग वाढतो.४. सूत्रे आणि आकडेमोड वेगळी लिहा: सराव करताना नवीन सूत्रे आणि महत्त्वाचे नियम एका स्वतंत्र वहीत लिहून ठेवा. यामुळे उजळणी करणे सोपे जाते.५. व्यावहारिक उदाहरणे सोडवा: गणित अधिक सोपे वाटण्यासाठी दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा वापर करा (उदा. बाजारात जाताना हिशोब करणे).६. शांत वातावरणात अभ्यास करा: गणित सोडवताना पूर्ण लक्ष केंद्रित असणे गरजेचे आहे. गोंगाट नसलेल्या ठिकाणी अभ्यास करा.७. शंकांचे निरसन करा एखादे गणित सुटले नाही तर घाबरून न जाता शिक्षक किंवा मित्रांची मदत घेऊन ते समजून घ्या.अभ्यास कसा कराल ?सोप्या उदाहरणांपासून सुरुवात करा आणि हळूहळू कठीण उदाहरणांकडे वळा. प्रश्नातील माहिती व्यवस्थित वाचा आणि विचारलेली पायरी (डींशी) समजून घेऊनच उत्तरे सोडवा.



## ग्रामीण भागातही वाहनांचा खप जादा

एप्रिल २०२६ मध्ये भारतातील वाहनांच्या किरकोळ विक्रीने नवा विक्रम केला. या महिन्यात देशभरात सुमारे २६.१ लाख वाहने विकली गेली. गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्याच्या तुलनेत ही वाढ सुमारे १२.९४ टक्के आहे. विशेष म्हणजे या वाढीमध्ये ग्रामीण भागाचा वाटा शहरांपेक्षा अधिक राहिला. त्यामुळे देशातील वाहन बाजारात ग्रामीण मागणी पुन्हा मजबूत होत असल्याचे चित्र दिसत आहे.

'फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशन' (फाडा) ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, वाहनांच्या सहा प्रमुख श्रेणींपैकी पाच श्रेणींमध्ये विक्रीचे नवे विक्रम झाले आहेत. यामध्ये दुचाकी वाहनांची विक्री १३ टक्क्यांनी वाढली तर तीनचाकी वाहनांमध्ये सात टक्के वाढ झाली. प्रवासी वाहनांमध्ये १२ टक्के वाढ झाली, व्यावसायिक वाहनांमध्ये १५ टक्के वाढ झाली, तर ट्रॅक्टर विक्रीत तब्बल २३.२२ टक्के वाढ झाली. फक्त बांधकाम उपकरणे श्रेणीत सुमारे दोन टक्क्यांची घट नोंदवण्यात आली. 'फाडा'चे उपाध्यक्ष साई गिरीधर यांनी सांगितले, की सध्याची वाढ कायम राहिली, तर २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये वाहन उद्योगात दहापेक्षा अधिक टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. त्यांच्या मते या वाढीमागे काही महत्त्वाची कारणे आहेत. जीएसटी २.० नंतर ग्राहकांची खर्च करण्याची क्षमता वाढली, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या व्याजदर धोरणामुळे वाहन



कर्जावरील 'ईएमआय' तुलनेने परवडू लागले आणि लग्नसराईच्या हंगामामुळे वाहनखरेदीत मोठी वाढ झाली. आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसर्या सहामाहीमध्ये दिसलेली मजबूत ग्राहक मागणी नवीन आर्थिक वर्षातही कायम आहे.

**ग्रामीण भागात तिप्पट वाढ**

प्रवासी वाहनांच्या विक्रीमध्ये एप्रिल २०२६ हा आतापर्यंतचा सर्वोत्तम महिना ठरला. या महिन्यात सुमारे ४,०७,३५५ प्रवासी वाहने विकली गेली. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही वाढ १२.२१ टक्के आहे. या विभागातील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागातील वाढ शहरांपेक्षा खूप जास्त राहिली. ग्रामीण भागात वाहनविक्री २०.४० टक्क्यांनी वाढली, तर शहरी भागात ही वाढ ७.११ टक्के होती. म्हणजेच ग्रामीण वाढ शहरी वाढीच्या जवळपास तीनपट होती. लहान कार्सची मागणी पुन्हा वाढू लागली आहे. एसयूव्ही वाहनांची लोकप्रियता कायम आहे आणि पर्यायी इंधनावर चालणार्या वाहनांची मागणीही वाढत आहे.

**सीएनजी वाहनांची विक्री सर्वाधिक**

सीएनजी वाहनांचा बाजारातील हिस्सा २२.६२ टक्क्यांवर मजबूत राहिला आहे. त्याच वेळी इलेक्ट्रिक वाहनांचा हिस्सा वाढून ५.७७ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. प्रवासी वाहन कंपन्यांकडे विकल्या न गेलेल्या वाहनांचा साठा आता २८ ते ३० दिवसांच्या पुरवठ्याइतकाच राहिला आहे. उद्योगाच्या दृष्टीने हे प्रमाण संतुलित आणि सकारात्मक मानले जाते. दुचाकी वाहनांच्या विक्रीनेही दमदार कामगिरी कायम ठेवली.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




या सर्व उपचारामुळे हा त्रास दूर केला जातो. नाहीतर औषधे देण्यात येतात. तरी परिणाम हाती येत नसल्यास शल्यचिकित्सा केली जाते.तरी या आजाराबद्दल महिला जागरूक नाहीत. बर्‍याच स्त्रिया हे सामान्य लक्षण असल्याचा विचार करून डॉक्टरांकडे जात नाही. पण वेळीच ह्याचे निदान न केल्यास हा आजार गंभीर होऊ शकतो. यासाठी गरज आहे की स्त्रियांनी लाज न बाळगता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. यावर उचित औषधोपचार करावं. हा एक सामान्य आजार असून उपचार करणे देखील सोपे आहे. परंतू दुर्लक्ष केल्याने समस्या मोठं रूप धारण करू शकते.

## २ Joke — विनोद




आई : अरे बाळू, छोटी का रडतेय.
बाळू : अगं, तिला अंगणात हौद खणून हवाय.
आई : मग दे की खणून.
बाळू : दिला खणून पण ती म्हणतेय आता तो घरात आण.

## ३ Message — संदेश




Santa: tumne us aadmi ko aisa kyu maara?
Banta: usne mujhe poocha ke "Khaana khaaye kya"?
Santa: arey, bhala hi poocha hai na. phir kyu maara?
Banta: main toilet mein baita tha.

## ४ Thought — सुविचार


आत्म्यामुळेच आपले जीवन उदात्त होते.
- सिनेका



**संस्कृत सुभाषित**

अनिशश्चावमानी च स शीघ्रंभ्रश्यते श्रियः।।
(सौप्तिकपर्व, अध्याय २, फ्क २५, महाभारत)
अर्थ - हातात सत्ता नसतानाही जो दुसऱ्याचा उपमर्द करतो तो ऐश्वर्यापासून लवकरच भ्रष्ट होत

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. आराम करण्याचे सणवार? (वाक्प्रचार)
१०. छोटे कुबड
१२. पुरुष
१३. निवासस्थान
१४. रमापती
१५. जेमतेम, मोठ्या मुष्किलीने
१७. एक पालेभाजी
१९. कामावर बहिष्कार
२०. आंब्याचे रोप
२२. भीती, वचक
२३. अकस्मात, पूर्वकल्पना नसताना
२४. शिऱ्यातील प्रमुख पदार्थ
२५. निपचिप
२७. नशीब, काम
२८. फजिती, टवाळी
३०. प्रयत्न
३१. रममाण, निमग्न
३२. काम टाळणारा
३४. रेशमी धोतर
३७. घाण पाणी
४०. विनंती
४२. गर्व, ताठा
४३. रोगप्रतिबंधक द्रव
४५. गारा
४६. वानवा, उणीव
४८. घराची सजावट
५०. विद्यार्थ्यांचे राहण्याची जागा
५२. वैताग, नाकी आणलेला दम!
५४. पंख
५६. खून, वध
५८. बोलविणे
५९. अपवित्र
६२. सहाय्य
६४. सूर्याचा मंत्र
६५. परिस्थितीला अचानक मिळालेले वळण
६६. छाटणे
६७. आश्चर्य
६८. कर भरण्याची योग्यता
७०. दुर्लक्ष, हेळसांड
७२. चिक्कू माणूस
७३. नवीन
७४. लोकांचे राज्य
७६. साईबाबांची उक्ती
७९. मोठे गाव
८०. अवलोकन
८१. नजरफेक

### उभे शब्द

१. सूर्य
२. उत्तराधिकार
३. प्रत्येक वर्ष
४. श्रीरामाचे एक नाव
५. पराभव
६. पचनास सहाय्य करणार पदार्थ
७. गुन्हा
८. पूर्ण भरतीचे वेळ
९. उद्धट, अरेरावी करणारा मनुष्य
११. गुरांचा जमाव
१६. निरर्थक बडबड
१७. गडीमाणसे
१८. वरपांगी
१९. संभाव्य धोका
२१. हिंदीतील आढेवेढे
२२. दोरा
२४. कांती, तेज
२६. ऱ्हास
२९. जीभ
३०. पंतप्रधान
३३. कावळ्याचे ओरडणे
३५. करुणा, कीव
३६. भांडण
३८. वर्तमानपत्रातील कप्पा
३९. सभेची जागा
४१. रानभूल
४४. जळाऊ लाकूड
४६. पुष्कळ
४७. वाहून नेणे
४८. कायदा-सुव्यवस्थेला जबाबदार मंत्री
४९. खंदक
५१. मनाला टोचणारे दु:ख
५३. श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदाभेद
५५. अलमारी
५७. मीठ (हिंदी)
५८. जमाखर्च
५९. गटार
६०. भरपूर मार देणे, चोपणे (वाक्प्रचार)
६१. 'गपापा' होणारा ऐवज!
६३. तुकडी, पाकळी
६५. कोलकाताचे जुने नाव
६७. डोळे,६९. संकटातून पार करणारा
७०. निराश
७१. मोठा आवाज
७३. अपऱ्या नाकाचा
७५. पडसे,७६. च्या बरोबर
७७. प्रेम की पैसा?
७८. पहिला आकडा

### आडवे उत्तर

१.दिवाळी दसरा हातपाय पसरा १०.पोक १२.नर १३.घर १४.रमावर १५.कसाबसा १७.चाकवत १९.संप २०.कलम २२.धाक २३.अचानक २४.रवा २५.गपगार २७.कर्म ३०.प्रयास ३१.रत ३२.चुकार ३४.कद ३७.नरकवणी ४०.याचना ४२.नक्षा ४३.लस ४५.कारका ४६.अभाव ४८.गृहरचना ५०.वसतिगृह ५२.वात ५४.पर ५६.हनन ५८.आमंत्रण ५९.नापाक ६२.मदत ६४.गायत्री ६५.कलाटणी ६६.कलम ६७.नवल ६८.करपात्रता ७०.हयगय ७२.कद्रू ७३.नव ७४.जनसत्ता ७६.सबका मालिक एक ७९.शहर ८०.पाहणे ८१.कटाक्ष

### उभे उत्तर

१.दिनकर २.वारसा ३.दरसाल ४.राघव ५.हार ६.पाचक ७.परत ८.समा ९.रावणाचा लेक ११.कळप १६.बकवास १७.चाकरचुकर १८.वरकरणी १९.संकट २१.मगर २२.धागा २४.रया २६.पतन २९.रसना ३०.प्रधानमंत्री ३३.कावकाव ३५.दया ३६.कलह ३८.रकाना ३९.सभागृह ४१.चकवा ४४.सरपण ४६.अति ४७.वहन ४८.गृहमंत्री ४९.चर ५१.सल ५३.तरतमभाव ५५.कपाट ५७.नमक ५८.आयव्यय ५९.नाला ६०.कणीक तिंबणे ६१.हपापाचा माल ६३.दल ६५.कलकत्ता ६७.नयन ६९.तारक ७०.हताश ७१.गजर ७३.नकटा ७५.सर्दी ७६.सह ७७.माया ७८.एक

# चंदेरी दुनिया





## ‘तुंबाडची मंजुळा’चा ट्रेलर प्रदर्शित

सध्या सर्वत्र चर्चेचा विषय असलेला ,आपल्या पोस्टर, टिझर आणि गाण्यांमधून प्रचंड उत्सुकता निर्माण केलेल्या झी स्टुडिओजची निर्मिती असलेल्या तुंबाडची मंजुळा या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीस आला असून त्यातून या चित्रपटाबद्दलची उत्कंठा अजूनच जास्त वाढली आहे. रहस्य, भीती , गुढता आणि त्याच्या सोबतीला एकाहून एक अतरंगी गावकऱ्यांची धमाल गोष्ट या ट्रेलरमधून बघायला मिळत असल्याने एक परिपूर्ण मनोरंजक चित्रपटाची मेजवानी मिळणार असल्याची चर्चा प्रेक्षक सोशल मीडियावर करत आहेत.

कान्सच्या रेड कार्पेटवर झळकली मराठी संस्कृती; अशोक आणि निवेदिता सराफ यांचा खास लूक!

फ्रान्स : जगभरात सध्या ७९ व्या ‘कान्स फिल्म फेस्टिवल २०२६’ची जोरदार चर्चा रंगली आहे. बॉलिवूड आणि हॉलिवूड कलाकारांसोबत यंदा मराठी कलाकारांनीही ...

मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात या चित्रपटाचा ट्रेलर अनेक मान्यवरांच्या आणि कलाकारांच्या उपस्थितीत प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटात आजीच्या भूमिकेत दिसणाऱ्या उषा नाडकर्णी यांच्या निवेदनातून आपण या गावात आणि त्या विश्वात प्रवेश करतो. या ट्रेलरमध्ये गावाची आणि तिथल्या व्यक्तिरेखांची ओळख करून देताना त्यांच्या खास शैलीतील निवेदनामुळे ट्रेलरला एक वेगळीच रंगत आली आहे. यामध्ये एक गाव, त्यातील गावकरी, त्यांच्यावर घोंगावणारं एक अदृश्य संकट आणि त्यातून घडणाऱ्या असामान्य घटनांची झलक पाहायला मिळते. जरी चित्रपटाला भयपटाची पार्श्वभूमी असली, तरी हा चित्रपट निखळ विनोद आणि भरभरून मनोरंजनाचा अनुभव देणारा असल्याचं ट्रेलरमधून स्पष्ट होतं. मकरंद अनासपुरे, जितेंद्र जोशी , ओम भुतकर, अंशुमन विचारे, यो-गेश शिरसाट, गणेश पंडीत, शार्दूल सराफ यांच्यासोबत इतर कलाकारांचा सहजसुंदर अभिनय, विनोदाचं अचूक टायमिंग, सोबतीला असलेले भन्नाट संवाद यातून या गोष्टीची आणि या गावाची अतरंगी झलक आपल्या बघायला मिळते. पण सोबतीनेच ट्रेलरच्या उत्तरार्धात एका गुढ वलयात दिसणारी सई ताम्हणकर सर्वांचं लक्ष वेधून घेते. तिचं नेमकं पात्र काय आहे ?तिच्या गुढतेमागची गोष्ट काय आहे ? असा विचार हा ट्रेलर बघणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाच्या मनात येतो आणि या कथेबद्दलची उत्कंठा वाढवतो. रहस्य उलगडण्याच्या प्रवासात प्रेक्षकांना खळखळून हसवतानाच पुढे काय घडणार याची उत्सुकता कायम ठेवण्यात ट्रेलर यशस्वी ठरताना दिसत आहे.

‘राजा शिवाजी’चा तिसऱ्या आठवड्यातही दबदबा; ७५ कोटींचे बजेट वसूल, आता १०० कोटींकडे वाटचाल!

मुंबई : अभिनेता रितेश देशमुख (ठळींशळीह ऊशीहर्ीज्ञह) याचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या ‘राजा शिवाजी’ चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. तिसऱ्या ...

दिग्दर्शक विविध कोरेगांवकर म्हणतात, ''करीअरच्या सुरुवातीलाच एवढ्या मोठ्या चित्रपटाचं दिग्दर्शन करायची संधी मिळणं ही माझ्यासाठी अत्यंत मोठी गोष्ट आहे. झी स्टुडिओज मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनी माझ्यावर विश्वास टाकत ही संधी मला दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. हा चित्रपट प्रेक्षकांना एका वेगळ्या आणि अनोख्या विश्वात घेऊन जाणारा अनुभव आहे. हा चित्रपट तयार करताना आम्ही प्रत्येक पात्र, त्याची शैली आणि प्रत्येक प्रसंग वेगळ्या पद्धतीने उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. ट्रेलरमधून आम्ही एक छोटीशी झलक दाखवली आहे. 'तुंबाडची मंजुळा' प्रेक्षकांना नक्की आवडेल, याची आम्हाला खात्री आहे.''

झी स्टुडियोजचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणतात, ''तुंबाडची मंजुळा हा खऱ्या अर्थाने पूर्णपणे झी स्टुडिओजची निर्मिती असलेला चित्रपट आहे त्यामुळे आमच्यासाठी त्याचं विशेष महत्त्व आहे. आपल्या प्रेक्षकांना एक परीपूर्ण मनोरंजन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. एकाहून एक दिग्गज कलाकार , गुढता आणि रहस्याभोवती फिरणाऱ्या गोष्टीला दिलेला विनोद-ाचा तडका , श्रवणीय संगीत असे मनोरंजनाचे विविध पैलू यात प्रेक्षकांना बघायला मिळतील. सध्या प्रेक्षकांना मनोरंजनासोबत काहीतरी वेगळं आणि ताजं पाहायचं आहे आणि हा चित्रपट त्याच अपेक्षांवर नक्कीच खरा उतरेल, असा विश्वास आम्हाला आहे. रहस्य, विन-ोद आणि कलाकारांची भन्नाट केमिस्ट्री यामुळे हा चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आपलासा वाटेल. त्र्र्ींळपवर एींशपीं ईींपलशी झरीरिूळ ऋळसहीं तळीरश्र तळवशे : 'हाथ मत लगाओ...' गोविंदाचे बाऊन्सर्स आणि पॅपाराझींमध्ये राडा; थेट हाणामारीवर उतरले, राड्याचा व्हिडिओ आला समोर९० च्या दशकात आपल्या अफलातून नृत्यशैली आणि भन्नाट विनोदबुद्धीच्या जोरावर बॉलिवूडवर अधिराज्य गाजवणारे लाडके अभिनेते गोविंदा (त्र्र्ींळपवर) नेहमीच कोणत्या ना ...रहस्य, विनोद आणि दमदार कथानकाची मेजवानी घेऊन येणारा ‘तुंबाडची मंजुळा’ हा चित्रपट आता ५ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. विविध कोरगांवकर दिग्दर्शित या चित्रपटाची कथा आणि लेखन ऋषिकेश तुरई यांनी केले असून झी स्टुडिओज प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती उमेश कुमार बन्सल आणि बवेश जानवलेकर यांनी केली आहे.

## देऊळ बंद २चा महाराष्ट्रभर धुमाकूळ!

मुंबई : महाराष्ट्रभर ‘श्री स्वामी समर्थ’ नामाचा गजर घुमवत बहुचर्चित मराठी चित्रपट ‘देऊळ बंद २ : आता परीक्षा देवाची’ने बॉक्स ऑफिसवर दमदार एन्ट्री केली आहे. २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या सुपरहिट ‘देऊळ बंद’ या चित्रपटाने श्रद्धा आणि विज्ञान यांच्यातील संघर्ष प्रभावीपणे मांडत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं होतं. तब्बल ११ वर्षांनंतर आलेल्या या सिक्वेललाही प्रेक्षकांचा तितकाच जबरदस्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे.विशेष म्हणजे, पारंपरिक शुक्रवारऐवजी चित्रपट गुरुवारी पहाटे ब्रह्ममुहूर्तावर प्रदर्शित करण्यात आला. गुरुपुष्यामृत योग साधत सकाळी ६ वाजताच चित्रपटाचा पहिला शो सुरू झाला आणि पहाटेपासूनच थिएटरमध्ये प्रेक्षकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. राज्यातील अनेक चित्रपटगृहांमध्ये पहिल्याच दिवशी शो हाऊसफुल झाल्याचं चित्र होतं. पुणे, पिंपरी-चिं-चवड, मुंबई, नाशिक, जळगाव, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात चित्रपटाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

‘देऊळ बंद २’च्या पहिल्या दिवसाच्या कमाईनेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, चित्रपटाने पहिल्याच दिवशी १,१७५ शोजमधून तब्बल २.४५ कोटी रुपयांचे नेट कलेक्शन केले आहे. तर भारतातील एकूण ग्रॉस कलेक्शन २.८९ कोटी रुपयांपर्यंत पोहा-चले आहे. मराठी चित्रपटसृष्टीसाठी ही ओपनिंग अत्यंत दमदार मानली जात आहे.मुंबईतील भांडुप, कल्याण, नालासोपारा, अंधेरी, ठाणे आणि लोअर परळसारख्या मराठीबहुल भागांमध्ये चित्रपटाची प्रचंड क्रेझ पाहायला मिळाली. अनेक थिएटरमधील सर्व शो हाऊसफुल्ल झाले असून तिकीट खिडक्यांवर प्रेक्षकांची गर्दी उसळली होती. ‘बुक माय शो’सारख्या ऑनलाईन बुकिंग प्लॅटफॉर्मवरही तिकिटांसाठी मोठी झुंबड उडाल्याचं दिसून आलं.सोशल मीडियावरही ‘देऊळ बंद २’ची जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपटातील भावनिक प्रसंग, प्रभावी संवाद, दमदार कथानक, संगीत आणि कलाकारांच्या अभिनयाचं प्रेक्षकांकडून भरभरून कौतुक केलं जात आहे. अनेकांनी हा चित्रपट श्रद्धा, भावना वास्तव यांचा संगम आणि उत्तम असल्याचं म्हटलं आहे.

## मी स्क्रिप्ट वाचत बसत नाही तर लेखकांकडून व्हिजन ऐकतो: भाईजान

सलमान खान यांनी भारतीय सिनेमात अशा सुपरस्टारची ओळख निर्माण केली आहे, ज्यांच्या चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर अनेक विक्रम मोडले आहेत आणि अनेक पिढ्यांमध्ये प्रचंड चाहतावर्ग तयार केला आहे. सलमान खान यांना अनेकदा असा स्टार मानले जाते की ते स्वतःही लेखन प्रक्रियेशी जोडलेले आहेत. त्यामुळे सामान्यतः असे मानले जाते की ते प्रत्येक चित्रपट साइन करण्यापूर्वी स्क्रिप्ट बारकाईने वाचत असतील. मात्र अलीकडेच या सुपरस्टारने आपल्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल खुलासा करत सांगितले की त्यांनी आयुष्यात आजपर्यंत कधीही स्क्रिप्ट वाचलेली नाही, तर ती फक्त ऐकली आहे, जेणेकरून दिग्दर्शक आणि लेखकाचा व्हिजन अधिक चांगल्या प्रकारे समजू शकेल. सलमान खान म्हणाले, मी माझ्या संपूर्ण आयुष्यात कधीच स्क्रिप्ट वाचलेली नाही. मी त्या लिहिल्या आहेत, पण कधी वाचल्या नाहीत. मी स्क्रिप्ट ऐकतो. मला स्क्रिप्ट लेखक किंवा दिग्दर्शकाकडून ती ऐकायला आवडते, जेणेकरून तो कोणत्या प्रकारचा चित्रपट बनवत आहे आणि त्याचा व्हिजन काय आहे हे मला समजू शकेल. जर मी ती वाचली, व्हिजन तयार होईल आणि तो दिग्दर्शक किंवा असेल.सलमान यांच्या कामाबद्दल बोलायचे चित्रपट चर्ड्ढीलिहेळ: चरू थरी ठशीीं ळप या चित्रपटाची निर्मिती डरश्रारप घहरप केली आहे, तर दिग्दर्शन -ीींर होळ: चरू थरी ठशीीं धैर्य, तर माझ्या डोक्यात माझाच एक वेगळा लेखकाच्या व्हिजनपेक्षा वेगळा झाले तर ते त्यांच्या पुढील मोठ्या झशरलश साठी तयारी करत आहेत. ऋळश्री आणि सलमान खान यांनी डरज्ञहळर करत आहेत. चर्ड्ढील-ळप झशरलश हा चित्रपट बलिदान आणि जिद्दीची निडर आणि प्रभावी कथा म्हणून सादर केला जात आहे. या चित्रपटात उहळीरपसरवर डळपसह देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आ-हेत.



'हाथ मत लगाओ...' गोविंद-ाचे बाऊन्सर्स आणि पॅपाराझींमध्ये राडा; थेट हाणामारीवर उतरले, राड्याचा व्हिडिओ आला समोर

९० च्या दशकात आपल्या अफलातून नृत्यशैली आणि भन्नाट विनोदबुद्धीच्या जोरावर बॉलिवूडवर अधिराज्य गाजवण-ारे लाडके अभिनेते गोविंदा (त्र्र्ींळपवर) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रकाशझोतात असतात. अनेकदा पत्नी सुनीता अहुजा यांच्या वक्तव्यांमुळे तर कधी त्यांच्या वैयक्तिक आयुष्याविषयी उठणाऱ्या अफवांमुळे ते चर्चेत असतात. परंतु, यावेळी त्यांच्या चर्चेत येण्याचे कारण अगदी वेगळे आणि काहीसे अनपेक्षित आहे. गोविंदा उपस्थित असलेल्या एका भव्य कार्यक्रमात अचानक उद्भवलेल्या गोंधळामुळे ते पुन्हा एकदा बातम्यांचा विषय बनले आहेत.

सध्या सोशल मीडियावर या कार्यक्रमाचा एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत अनेक व्हिडिओ इंटरनेटवर व्हायरल झाले आहेत. परंतु, नेटकऱ्यांचे सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते एका वेगळ्याच व्हिडिओने. या क्लिपमध्ये गोविंदाचे बाऊन्सर्स अच-ानक पॅपाराझींवर संतापलेले आणि त्यांच्याशी हुज्जत घालताना स्पष्टपणे दिसत आहेत.मध्यस्थी करत गोविंदाने जिंकली सर्वांची मनेफोटो आणि व्हिडिओ काढण्याच्या साध्या कारणावरून सुरू झालेल्या या वादाने काही क्षणांतच रौद्र रूप धारण केले. गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी बाऊन्सर्सनी पॅपाराझींना धक्काबुक्की करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे तिथे मोठा राडा झाला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहताच, डान्स करत असलेले गोविंदा स्वतः त्या ठिकाणी धावून आले. एका खऱ्या सुपरस्टारप्रमाणे त्यांनी अत्यंत शांतता आणि संयम बाळगत परिस्थिती कोणत्याही नव्या चित्रपटात दिसले नसले, तरी विविध सार्वजनिक कार्यक्रम, टीव्ही शोज आणि इव्हेंट्सच्या माध्यमातून ते सातत्याने आपल्या चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करत असतात.चित्रपटांव्यतिरिक्त गोविंदा त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेतात. त्यांची पत्नी सुनीता आहुजा यांच्यासोबतच्या त्यांच्या नातेसंबंधांवरून अनेकदा उलटसुलट चर्चा रंगत असतात. बऱ्याचदा ते दोघे वेगळे राहत असल्याच्या आणि त्यांच्या घटस्फोटाच्या अफवाही उडत असतात. सुनीता आहुजा यांनी अनेक मुलाखतींमध्ये गोविंदांना उद्देशून मिश्किल टोमणे मारले आहेत, तसेच गोविंदाच्या कथित विवाहबाह्य संबंधांबद्दलही त्यांनी काही दावे केले होते. मात्र, गोविंद-ाने नेहमीच हे सर्व आरोप आणि अफवा ठामपणे फेटाळून लावत आपल्या वैवाहिक आयुष्याबद्दलची सकारात्मक बाजू मांडली आहे.

## गोविंदाचे बाऊन्सर्स आणि पॅपाराझींमध्ये राडा; थेट एकमेकांत हाणामारीवर उतरले

आहे. या व्हिडिओमध्ये गोविंदा आपल्या जुन्या आणि लोकप्रिय 'चीची' अंदाजात मॉडेल्ससोबत ठेका धरताना दिसत आ-हेत. आपल्या आवडत्या सुपरस्टारला पुन्हा त्याच ऊर्जेत पाहून चाहत्यांना जुन्या दिवसांची आठवण झाली आणि त्यांनी मोठा आनंद व्यक्त केला. मात्र, या आनंदाच्या वातावरणाला गालबोट लागले ते कार्यक्रमात घडलेल्या एका अनुचित प्रकारामुळे. गोविंदाचे सुर-क्षारक्षक (बाऊन्सर्स) आणि छायाचित्रकार (पॅपाराझी) यांच्यात अचानक जोरदार शाब्दिक चकमक उडाली आणि पाहता पाहता या वादाचे रूपांतर थेट हाणामारीत झाले.प्राप्त माहितीनुसार, सोमवारी रात्री आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष सोहळ्याला गोविंदाने हजेरी लावली होती. यावेळी त्यांनी परिधान केलेल्या काळ्या रंगाच्या सूटमध्ये त्यांचा रुबाब उठून दिसत होता. या कार्यक्रमात त्यांनी अतिशय उत्साहाने डान्स केला. त्यांच्या या डान्सचे नियंत्रणात आणली. त्यांनी आपल्या बाऊन्सर्सना तसेच पॅपाराझींनाही समजावत शांत राहण्याची विनंती केली.गोविंद-ाने दाखवलेल्या या प्रसंगावधानाचे आणि संयमी भूमिकेचे सोशल मीडियावर सर्वत्र कौतुक होत आहे. एका मोठ्या अभिनेत्याने स्वतःहून मध्यस्थी केल्याने अनेक युजर्सनी त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळली आहेत. गोविंदांनी अगदी योग्य पाऊल उचलले, ते किती शांत आणि समजूतदार आहेत, हा तर खऱ्या जेंटलमनचा स्वभाव आहे, अशा आशयाच्या अनेक सकारात्मक प्रतिक्रिया नेटकऱ्यांकडून येत आहेत. दरम्यान, गोविंदाच्या व्यावसायिक आयुष्याबद्दल बोलायचे झाल्यास, ते गेल्या काही वर्षांपासून रुपेरी पडद्यापासून दुरावले आहेत. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेला 'रंगीला राजा' हा त्यांचा शेवटचा चित्रपट ठरला. त्यानंतर ते





## ६ दिवस बेपत्ता असलेल्या इंदर कौरचा दुर्दैवी मृत्यू

कालव्यात सापडला मृतदेह

स्थानिक कार्यक्रम

पंजाब : पंजाबी मनोरंजन विश्वातून एक अत्यंत धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी बातमी समोर आली आहे. सुप्रसिद्ध पंजाबी गायिका इंदर कौर (खपवशी घरीी) उर्फ यशइंदर कौर हिची निर्घृण हत्या करण्यात आल्याचा आरोप तिच्या कुटुंबियांनी केला आहे. तब्बल सहा दिवस बेपत्ता असलेल्या इंदर कौरचा मृतदेह १९ मे रोजी सकाळी लुधियानाजवळील नीलो कालव्यात आढळून आल्याने संपूर्ण पंजाबी संगीतविश्वात खळबळ उडाली आहे. अवघ्या २९ वर्षीय गायिकेच्या मृत्यूने चाहत्यांनाही मोठा धक्का बसला आहे.

इंदर कौर गेल्या सहा दिवसांपासून बेपत्ता होती. तिच्या कुटुंबीयांच्या आरोपानुसार, तिला गन पॉईंटवर जबरदस्तीने किडनॅप करण्यात आलं होतं. इतकंच नव्हे, तर कॅनडाहून आलेल्या एका व्यक्तीनं इंदरवर लग्नासाठी दबाव टाकला होता. मात्र, इंदरनं लग्नास स्पष्ट नकार दिल्यानंतर त्याच व्यक्तीनं तिची हत्या केल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, मोगा येथील एका व्यक्तीकडून इंदर कौरवर जबरदस्तीने लग्न करण्यासाठी दबाव टाकला जात होता. मात्र, इंदरनं त्या व्यक्तीचा प्रस्ताव नाकारला. त्यानंतर आरोपीने संतापाच्या भरात तिचं अपहरण केल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित आरोपी हा कॅनडामध्ये राहत होता आणि विशेष कट रचण्यासाठी तो नेपाळमार्गे पंजाबमध्ये आला होता. घटना घडवल्यानंतर तो पुन्हा त्याच मार्गाने कॅनडाला फरार झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, सुमारे तीन वर्षांपूर्वी इंदरची आरोपीशी इन्स्टाग्रामवर ओळख झाली होती. सुरुवातीला दोघांमध्ये मैत्री होती. मात्र, संबंधित व्यक्ती आधीपासून विवाहित असून त्याला मुलं असल्याचं इंदरला समजताच तिनं त्याच्याशी लग्न करण्यास नकार दिला होता. याच कारणामुळे आरोपी तिच्यावर राग धरून असल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, पोलिसांनी इंदर कौरचा मृतदेह कालव्यातून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी समराला येथील शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून पोलिसांकडून विविध अंगांनी चौकशी केली जात आहे.

इंदर कौरची शेवटची सोशल मीडिया पोस्ट सध्या मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. १३ मे रोजी तिनं आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर एक फोटो शेअर केला होता. त्या फोटोमध्ये ती ब्राउन रंगाचा शर्ट परिधान करून हातात बॅग घेत पोझ देताना दिसत होती. तिच्या या पोस्टवर चाहत्यांनी लाईक्स आणि कमेंट्सचा अक्षरशः वर्षाव केला होता. मात्र, तिच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर आता त्याच पोस्टखाली चाहते शोक व्यक्त करत श्रद्धांजली वाहताना दिसत आहेत.दरम्यान, सोशल मीडियावर एक मोठा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. जर इंदर कौरचं सहा दिवसांपूर्वी अपहरण झालं होतं, तर पाच दिवसांपूर्वी तिच्या अकाउंटवर पोस्ट नेमकी कोणी शेअर केली? काही नेटकऱ्यांच्या मते, ही पोस्ट आधीच शेड्यूल करून ठेवण्यात आली असावी. मात्र, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.पंजाबी संगीतविश्वात इंदर कौर हे एक लोकप्रिय नाव होतं. तिनं ‘जीजा’, ‘किसान एंथम २’, ‘देसी सिरे दा’, ‘जट्ट माइंड’, ‘नबज जट्टी दी’ आणि ‘अकड़’ यांसारखी अनेक लोकप्रिय गाणी गायली होती. तिच्या गाण्यांना प्रेक्षकांकडून मोठी पसंती मिळाली होती. तिच्या अकस्मात निधनामुळे पंजाबी मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली आहे.



## १८ व्या इंडिया हॅबिटॅट फिल्म फेस्टिव्हलमध्ये मराठी चित्रपट आशा ला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नवी दिल्ली/वृत्तसेवा :** आशा आरोग्य सेविकांच्या प्रेरणादायी जीवनावर आणि त्यांच्या योगदानावर आधारित दीपक पाटील दिग्दर्शित मराठी चित्रपट आशा याच्या प्रदर्शनाला प्रतिष्ठित 18th India Habitat Film Festival मध्ये प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. खपवळर क्रलळींरीं उशर्पीश येथे आयोजित या प्रदर्शनावेळी सभागृह खचाखच भरले होते. चित्रपटातील संवेदनशील मांडणी आणि सामाजिक आशयामुळे प्रेक्षकांनी चित्रपटाचे विशेष कौतुक केले.

आशा हा चित्रपट ग्रामीण भागातील आशा आरोग्य सेविकांच्या अथक कार्यावर आधारित असून, जनजागृती, आरोग्य सेवा आणि समुदाय सहभागाच्या माध्यमातून मातामृत्यू दर कमी करण्यासाठी त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचे प्रभावी चित्रण करतो. या अग्रभागी काम करणाऱ्या आरोग्य सेविकांना भेडसावणाऱ्या आव्हानांसोबतच माता आणि बाल आरोग्य सुधारण्यासाठी त्यांचे समर्पण चित्रपटातून अधोरेखित करण्यात आले आहे.

चित्रपटाच्या वास्तववादी कथनशैलीला, प्रभावी अभिनयाला आणि तळागाळातील आरोग्य उपक्रमांवर आधारित प्रभावी संदेशाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. प्रदर्शनानंतर चित्रपटाच्या निर्मात्या दैवता पाटील यांनी प्रेक्षकांशी संवाद साधत चित्रपट निर्मितीचा प्रवास आणि आशा सेविकांचे जीवन वास्तववादी पद्धतीने मांडण्यासाठी करण्यात आलेल्या अभ्यासाविषयी माहिती दिली. अनेक प्रेक्षकांनी भारताच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या आशा सेविकांच्या दुर्लक्षित योगदानाकडे लक्ष वेधल्याबद्दल चित्रपटाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना फेस्टिव्हल संचालक, डॉक्टर के जी सुरेश म्हणाले, आशा हा चित्रपट आशा आरोग्य सेविकांच्या असामान्य कार्यावर प्रकाश टाकणारा अत्यंत महत्त्वाचा चित्रपट आहे. हा चित्रपट केवळ मानवी भावना व्यक्त करणारी कथा सांगत नाही, तर तळागाळात काम करणाऱ्या महिलांनी घडवून आणलेल्या सामाजिक परिवर्तनाचेही प्रभावी दस्तऐवजीकरण करतो. प्रेक्षकांनी चित्रपटाशी इतक्या मोठ्या प्रमाणात भावनिक नाते जोडलेले पाहून आनंद होत आहे.

निर्मात्या दैवता पाटील म्हणाल्या, हा चित्रपट अत्यंत कठीण परिस्थितीतही माता आणि बालकांच्या आरोग्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या आशा सेविकांच्या जिद्दीला आणि समर्पणाला वाहिलेली आदरांजली आहे. फेस्टिव्हलमध्ये मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक असून, प्रदर्शनानंतर झालेल्या संवादातून प्रेक्षक चित्रपटातील भावनिक आणि सामाजिक वास्तवाशी किती खोलवर जोडले गेले आहेत, हे जाणवले.

इंडिया हॅबिटॅट फिल्म फेस्टिव्हलमधील आशा चित्रपटाच्या प्रदर्शनाने सामाजिक भान जपणाऱ्या आणि जनजागृती निर्माण करणाऱ्या अर्थपूर्ण चित्रपटांचे वाढते महत्त्व पुन्हा अधोरेखित केले.

## NEET पेपरफुटी प्रकरणात आणखी एक मोठी कारवाई

**पुणे/वृत्तसेवा :** देशभर गाजत असलेल्या नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून, या प्रकरणातील एका नव्या मास्टरमाईंडला अटक करण्यात आली आहे. भौतिकशास्त्राचे प्रश्न लीक केल्याप्रकरणी मनीषा या महिलेला बेड्या ठोकण्यात आल्या असून, या महत्त्वपूर्ण कारवाईमुळे पेपरफुटीच्या या मोठ्या रॅकेटचे आणखी काही धागेदोरे उघड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुण्यातील सेठ हिरालाल सर्फ प्रशालेत कार्यरत असलेल्या मनीषा हवालदार हिला सीबीआयने नीट पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून अटक केली आहे.

# संरक्षण दलातील प्रशिक्षण, दुखापत प्रतिबंध आणि कार्यक्षमता वाढीसाठी क्रीडा फिजिओथेरपी महत्त्वाची

### डॉ. विजय त्रिपाठी; सीआरपीएफ प्रशिक्षण केंद्रात क्रीडा फिजिओथेरपी शिबिर





**लातूर/प्रतिनिधी :** संरक्षण दल हे देशाच्या सुरक्षेचे प्रमुख आधारस्तंभ असून सैनिकांना अत्यंत कठोर शारीरिक व मानसिक परिस्थितींमध्ये कार्य करावे लागते. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण वैज्ञानिक, शिस्तबद्ध आणि कार्यक्षम पद्धतीने होणे आवश्यक आहे. प्रशिक्षणादरम्यान होणाऱ्या दुखापती टाळण्यासाठी तसेच सैनिकांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी क्रीडा फिजिओथेरपीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या क्रीडा फिजिओथेरपी विभागाचे प्रमुख डॉ. विजय त्रिपाठी यांनी केले. महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातर्फे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ) प्रशिक्षण केंद्र, लातूर येथे आयोजित क्रीडा फिजिओथेरपी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिबिरात डॉ. विजय त्रिपाठी बोलत होते. यावेळी सीआरपीएफचे पोलिस उप महानिरीक्षक ए. एच. अन्सारी, वरिष्ठ पोलिस अधिकारी प्रशांत राय, सहयोगी प्रा. डॉ. मेघा बक्षी तसेच प्रशासकीय अधिकारी सत्यवान झरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. विजय त्रिपाठी यांनी संरक्षण दलातील विविध प्रशिक्षण प्रक्रियेची माहिती दिली. ते म्हणाले की, सैनिकांना धावणे, वजन प्रशिक्षण, अडथळा शर्यती, पोहणे, पर्वतारोहण, सहनशक्ती वर्धक व्यायाम यांसह युद्ध प्रशिक्षण, शस्त्र हाताळणी, रणनिती सराव आणि मानसिक स्थैर्य विकसित करणाऱ्या कठोर प्रशिक्षणातून जावे लागते. या प्रशिक्षणामुळे सैनिकांची शारीरिक क्षमता, वेग, संतुलन आणि सहनशक्ती वाढते; मात्र त्याचबरोबर स्नायू ताण, लिगामेंट दुखापती, गुडघे व खांद्यांच्या समस्या, पाठदुखी आणि स्ट्रेस फ्रॅक्चर यांसारख्या दुखापतींचा धोका देखील वाढतो.

दुखापतीनंतरच्या पुनर्वसन प्रक्रियेमध्ये क्रीडा फिजिओथेरपी अत्यंत प्रभावी ठरते. व्यायाम उपचार, मॅन्युअल थेरपी, इलेक्ट्रोथेरपी, टेपिंग तंत्र आणि शरीराच्या हालचालींच्या वैज्ञानिक विश्लेषणाच्या माध्यमातून सैनिकांची हालचाल अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम बनविता येते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. मेघा बक्षी यांनी सहभागींना दुखापतींची कारणे, प्रारंभीची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी योग्य वॉर्म-अप आणि कूल-डाउन, शरीरस्थिती सुधारणा, लवचिकता प्रशिक्षण, स्नायू बळकटीकरण, संतुलित आहार, पुरेशी विश्रांती आणि वैज्ञानिक प्रशिक्षण पद्धतीचे महत्त्व सांगितले.

शिबिरा दरम्यान गतिशीलता, संतुलन, सहनशक्ती, चपळता आणि कार्यात्मक तंदुरुस्ती वाढविण्यासाठी विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. उच्च तीव्रतेचे अंतराल प्रशिक्षण, शक्तिवर्धक व्यायाम, योग, ध्यान आणि पुनर्प्राप्ती तंत्रांचा सैनिकांच्या कार्यक्षमतेवर होणारा सकारात्मक परिणामही स्पष्ट करण्यात आला.

या शिबिराला सीआरपीएफचे प्रशिक्षणार्थी आणि सुरक्षा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पादुका दर्शन सोहळा आर्थिक व्यवहारातील दोषींवर कारवाईच्या मागणीसाठीच्या धरणे आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

### ३ जूनला मांजरा कारखान्यासमोर रास्ता रोको करणार : प्रदीप पाटील खंडापूरकर




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील खंडापूर येथे दि. २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा पादुका दर्शन सोहळ्यासाठी देणगी स्वरूपात आलेल्या रकमेमध्ये कोट्यवधी रुपयांचा अपहार किशोर जाधव व अन्य आयोजकांनी केला आहे . या प्रकरणातील दोषींवर अटकेची कार्यवाही करून आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी शुक्रवार दि. २२ मे रोजी लातूर शहरातील गांधी चौकात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने आयोजित धरणे आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याच मागणीसाठी येत्या दि. ३ जून २०२६ रोजी मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्यासमोर रास्ता रोको आंदोलन करणार असल्याची माहिती समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी दिली.

या पादुका दर्शन सोहळ्यात कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ब्रिक्स ह्युमन राईट मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका लेखी निवेदनाद्वारे लातूरच्या पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. खंडापूर येथे पार पडलेल्या पादुका दर्शन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संत आले होते. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तेलंगणा आदी भागातून वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्याचा जवळपास ६० लाखांहून अधिक भाविकांनी आनंद घेतला होता. सोहळ्यासाठी अंदाजे ३७०० देणगी पुस्तिका छापण्यात आल्या होत्या. प्रत्येक देणगी पावती पाच हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची आहे. या सोहळ्यासाठी छोटे कदम माऊली महाराज व तोतया भामटा किशोर जाधव शिवणीकर हे संपूर्ण मराठवाड्यात फिरून लोकांकडून मदत, पैसे गोळा करत होते. यात विशेष योगदान खंडापूरच्या नागरिकांचे आहे. खंडापूरच्या लोकांनी स्वतःच्या खर्चाने परिसर स्वच्छ करून दिला. कार्यक्रमासाठी भाविकांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केल्याचे सर्वांनी पाहिलेही आहे. या सोहळ्यात झालेल्या अपहार आणि गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी सदर आंदोलन करण्यात आले. यावेळी किशोर जाधव शिवणीकर याच्या प्रतिमेस जोडेही मारण्यात आले.

या सोहळ्यासाठी वेगवेगळ्या भागातून भाकरी, चपात्या, पुरणपोळ्या, दूध, तूप, भाज्या आदी साहित्य पुरवले गेले. या सोहळ्यासाठी सामान्य नागरिकांसह विविध संस्था, राजकीय पुढाऱ्यांनीही मोठ्या रकमा देणगी स्वरूपात दिल्या आहेत. तसेच दानपेटीच्या माध्यमातूनही अंदाजे ५ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली आहे. पावती पुस्तकांच्या माध्यमातूनही किमान १८ कोटी ५० लाख रुपये जमा झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. औसा येथे धान्य विक्रीतून ४० लाख रुपये आल्याचा उल्लेखही त्यात करण्यात आला आहे.

या रकमा ज्या बँक खात्यावर जमा झाल्या, त्या कोणाच्या खात्यात जमा केल्या व कोणाच्या परवानगीने याची चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच भक्ती शक्ती पावन धाम सेवाभावी संस्था या संस्थेचे बँक खाते गोठवून संस्थेची चौकशी व्हावी, संस्थेच्या सर्वसंचालकानाची बँक खाती व मालमत्ता शासनाने तात्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत,अशी मागणीही यावेळी करण्यात आली. या प्रकरणातील दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी. अन्यथा येत्या दि. ३ जून रोजी मांजरा सहकारी साखर कारखान्यासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी दिला आहे. या धरणे आंदोलनात अमोल नानजकर , एड. राणीताई स्वामी, पृथ्वीराजसिंह पाटील,नेताजी जाधव, काशीबाई हांडे, योगीताताई ठाकूर, रामेश्वर डोणे , अमोल भालेराव, भीमराव वराडे, पृथ्वीराज पवार, पंडितराव लखनगिरे , अमर कैले, बप्पा टेळे, सुरेश जाधव, सुरेखा गाडेकर, संतोष तुरूप, टीनाताई शिंदे, शाहीर शिंदे, महेश पाटील, नागेश जाधव, दिनेश कांबळे, तुषार रेड्डी, गोपाळ माळी यांसह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

# ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर'ने सन्मान

### नवी दिल्लीतील जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषदेत मानाचा पुरस्कार




**मुंबई/प्रतिनिधी :** जगभरातील सरकारी, औद्योगिक, शैक्षणिक व संशोधन संस्थांच्या समन्वयातून ऊर्जा व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या ग्लोबल एनर्जी ॲण्ड एन्व्हायरमेंट फाउंडेशनच्या (जीईईएफ) वतीने महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांचा विद्युत क्षेत्रात मानव संसाधनातील कामगिरीसाठी 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने गौरव करण्यात आला.

'जीईईएफ'च्या वतीने शुक्रवारी (दि. २२) नवी दिल्ली येथे 'जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषद-२०२६' चे आयोजन करण्यात आले. या परिषदेत स्वच्छ आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध तज्ज्ञ सहभागी झाले होते व प्रामुख्याने विकसित भारत आणि ऊर्जा सुरक्षितता यावर विचारमंथन झाले.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी ८६ हजार कर्मचारी आणि सव्वा तीन कोटी वीजग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून विद्युत सुरक्षिततेचे उपक्रम व त्यासाठी जागतिक विक्रमी लोकसहभाग, कर्मचारी कल्याण व प्रोत्साहनपर धोरण, कर्मचारी संघटना संवाद-उपक्रम, आधुनिक कौशल्य विकास प्रशिक्षण, मानव संसाधनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, महिला कर्मचारी सन्मान व सक्षमीकरण, कर्मचाऱ्यांना हरित ऊर्जेसाठी प्रोत्साहन यासारखे कर्मचारी-हितैषी अनेक उपक्रम राबविले. व्यवस्थापनाच्या मंजुरीने धोरणात्मक निर्णय अंमलात आणले.

या कामगिरीचे मूल्यमापन करून 'जीईईएफ'च्या निवड समितीकडून जागतिक परिषदेत पुरस्कार जाहीर करण्यात आला. यात विद्युत क्षेत्रातील मनुष्यबळ विकासाच्या योगदानासाठी महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांचा 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. भारतातील रशियन फेडरेशनचे उपायुक्त डॉ. एव्हगेनी ग्रिव्हा, आइसलँडचे राजदूत श्री. बेनेडिक्ट होस्कुल्डसन आणि नीती आयोगाचे माजी सदस्य डॉ. विजयकुमार सारस्वत यांच्याहस्ते श्री. पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# तब्बल एका वर्षानंतर बेपत्ता अल्पवयीन मुलाचा शोध

### शिवाजीनगर पोलिसांच्या तांत्रिक तपासाला मोठे यश

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील सिग्नल कॅम्प परिसरातून जून २०२५ मध्ये बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलाचा तब्बल एका वर्षानंतर तिरुपती (आंध्रप्रदेश) येथून सुखरूप शोध घेण्यात शिवाजीनगर पोलिसांना यश आले असून, लातूर पोलिसांच्या चिकाटी, तांत्रिक तपास कौशल्य व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे एका कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी प्रशांत हरीश्चंद्र गपाट, रा. इंदापूर ता. वाशी जि. धाराशिव यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे दिलेल्या फिर्यादीत नमूद केले होते की, त्यांचा मुलगा अथर्व प्रशांत गपाट, (वय १४ वर्षे ९ महिने) हा सिग्नल कॅम्प, लातूर येथे वास्तव्यास असून दि. १७ जून २०२५ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे शाळेसाठी घराबाहेर पडला होता. त्यावेळी घरात त्याची बहीण उपस्थित होती. ती सकाळी ट्युशनवरून परत आल्यानंतर तिला अथर्व घरात दिसून आला नाही. त्याची शाळेची बॅग देखील घरात नसल्याने तो शाळेत गेला असावा असे तिला वाटले. मात्र, संध्याकाळपर्यंत तो घरी परत न आल्याने तिने वडिलांना संपर्क करून माहिती दिली. फिर्यादी हे त्या वेळी मूळ गावी असल्याने ते दुसऱ्या दिवशी लातूर येथे आले. त्यांनी मुलाचा शाळा, ट्युशन क्लास, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच शहर व परिसरात सर्वत्र शोध घेतला. मात्र अथर्वचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. अखेर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून मुलास पळवून नेल्याची शंका व्यक्त करत त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुरनं. २२८/२०२५ कलम १३७(२) बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास श्री. अमोल तांबे साहेब, पोलीस अधीक्षक, लातूर, श्री. मंगेश चव्हाण साहेब, अपर पोलीस अधीक्षक, लातूर तसेच श्री. समिरसिंह साळवे उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. पोलीस निरीक्षक श्री. अभिषेक शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सपोनि सुप्रिया केंद्रे व त्यांच्या तपास पथकाने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला.

तपासादरम्यान पोलिसांनी विविध तांत्रिक बाबींचा अभ्यास केला.अल्पवयीन मुलाने सोशल मीडियावर फेसबुक व इन्स्टाग्राम अकाउंट सुरू केल्याची माहिती मिळाल्यानंतर सायबर पोलीस स्टेशनच्या मदतीने सोशल मीडिया अकाउंटचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. विविध डिजिटल पुरावे आणि ऑनलाइन हालचालींचा अभ्यास करून पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली.

अत्यंत संयमाने आणि कौशल्यपूर्ण तपास करत अखेर दि. १९ मे २०२६ रोजी तिरुपती, आंध्रप्रदेश येथे अल्पवयीन मुलगा असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर तत्काळ पथक पाठवून संबंधित मुलास ताब्यात घेण्यात आले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलास सुखरूपपणे त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमधील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तुंग भरारी

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) आणि पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षेत लातूर येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित ३९;लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल३९;च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेमध्ये इयत्ता ५ वी मधून अनन्या वाघमारे, अनुष्का जाधव, आरोही खोसे, आयुषी गंगावणे, चैतन्य जाधव, नम्रता सोनवणे, प्रतिक मोरे, श्लोक लामजने, श्रेयस रीतापुरे, वैभव जवादे आणि विराज जोशी या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत यश मिळवले. तसेच इयत्ता ८ वी मधून जागृती माळी, सिद्धी करमले, ओम वाघमारे, सिद्धांत आलमले आणि वीरेंद्र सुकणे या विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तम गुण मिळवून यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या उत्तुंग यशामुळे मातोश्री कलावती प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे यांनी विशेष अभिनंदन केले. शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका संगीता शेटे, रुपाली कोकेटे, नम्रता झांबरे, विद्या पाटील, प्रियांका नागलबोने, शिक्षक वृंद आणि पालकांकडून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक होत आहे. या यशामुळे सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



वाघमारे अनन्या महार्व | जाधव अनुष्का संजय | खोसे आरोही किशोर | ादे वैभव संतोष | जोशी विराज पांडरंग
गंगावणे आयुषी शरद | सोनवणे नम्रता जालिंद | जाधव चैतन्य जीवन | माळी जागृती विजयकुमार | करमले सिद्धी दीपक
मोरे प्रतिक काकासाहेब | लामजने श्लोक व्यंकट | रीतापुरे श्रेयस सतीश | वाघमारे ओम अभिमन्यू | आलमले सिद्धांत दत्तात्र | सुकणे वीरेंद्र परशुराम

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# उन्हाच्या तडाख्यात कार पेटली

## अहमदपूरनजीक बर्निंग कारचा थरार!

**अहमदपूर/प्रतिनिधी :** तापमानात प्रचंड वाढीचा फटका एका कार मालकालाला बसला असून एका कारने अचानक पेट घेतली. चालकाने प्रसंगावधान राखून बाहेर पडल्याने सुदैवाने जीवितहानी टळली असून कार मात्र संपूर्ण जळून राख झाली आहे.

हा बर्निंग कारचा थरार २१ मे रोजी दुपारी दोनच्या सुमारास टाकळगावपाटी जवळ घडला आहे. या बाबत मिळालेली माहिती अशी की शिंदगी बुद्रुक ता.अहमदपूर येथील प्रशांत कमलाकर मुळे हे आपल्या खाजगी कामानिमित्त टाटा कंपनीच्या नेक्सॉन क्रमांक एमएच.५५ बी.०१९० या कारने काही खाजगी कामानिमित्त गंगाखेड येथे गेले होते.तिथले आपले काम आटोपून ते खंडाळी मार्गे अहमदपूरकडे परत येत होते. दुपारी दोनच्या सुमारास कडक उन्हात त्यांची गाडी अहमदपूरनजीक टाकळगाव पाटीजवळ आली असता, अचानक गाडीच्या समोरच्या बोनेटमधून मोठ्या प्रमाणावर धूर निघत असल्याचे चालक प्रशांत मुळे यांच्या लक्षात आले.

त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता गाडी तात्काळ रस्त्याच्या बाजूला घेतली आणि नेमका धूर कुठून निघतोय हे पाहण्यासाठी ते खाली उतरले. ते उतरत असतानाच गाडीने अचानक रौद्ररूप धारण करत पेट घेतला. कारला लागलेली आग एवढी भीषण होती की काही वेळातच आगीच्या ज्वालांनी संपूर्ण गाडीला वेढले. या घटनेची माहिती मिळताच अहमदपूर नगरपालिकेच्या अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले.





अग्निशामक दलाचे अधिकारी कैलास सोनकांबळे, ड्रायव्हर कम ऑपरेटर अजित अंगद लाळे आणि फायरमॅन प्रशांत गायकवाड यांनी तातडीने बंबासह घटनास्थळी धाव घेतली. अग्निशामक दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करत आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत आगीची तीव्रता जास्त असल्याने संपूर्ण गाडी जळून खाक झाली होती. सुदैवाने धूर निघत असतानाच चालक वेळीच खाली उतरल्यामुळे या मोठ्या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.वाढत्या तापमानामुळे गाडीच्या इंजिनमध्ये ओव्हरहीटिंग किंवा शॉर्टसर्किट होऊन ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

# अनाधिकृत पाणी चोरी करणाऱ्या नगरसेवका विरोधात कार्यवाही करा

## मनपा आयुक्तांकडे प्रभाग १६ मधील नागरिकांची तक्रार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहराची पाणी टंचाई सर्वज्ञात असून सर्वसामान्य नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकने नित्याचे झाले आहे. एकीकडे सर्वसामान्य लातूरकर पाणी टंचाईला तोंड देत असताना नगरसेवकांच्या घरात २ अनाधिकृत नळ आढळून आलेले आहेत. याप्रक्रणी मनपाने पंचनामाही केलेला असुन नगरसेविकेला नोटीस बजावण्यात आलेली आहे. मात्र केवळ नोटीस न बजावता त्या नगरसेविके विरोधात कार्यवाही करुन त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी प्रभाग १६ मधील नागरिकांनी निवेदनाच्या माध्यमातून मनपा आयुक्त, मानसी मीना यांना दिले आहे.

लातूर शहराला पाणी टंचाई नवीन नाही. पाण्यासाठी वणवण भटकणे लातूरकरांना नित्याचे झालेले असुन धरणात पाणी असून ही नागरिकांना पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ येत आहे. एकीकडे सर्वसामान्य नागरिक पाणी टंचाईने त्रस्त झालेला असताना मनपा लोकप्रतिनिधीच्याच घरात पाणी पुरवठा करणाऱ्या तीन नळ जोडण्या आढळून आलेल्या आहेत. यार्पकी दोन नळ जोडण्या अनाधिकृत असल्याची तक्रार यापूर्वी प्रभाग १६ च्या नागरिकांनी दिलेली होती. तक्रारदारांनी दिलेल्या तक्रानी नुसार मनपा प्रशासनाने प्रभाग १६ च्या नगरसेविका राजेश्री धोत्रे व त्यांची पती अंकीत बाहेती यांच्या घरी जावून मनपा प्रशासनाने याबाबत पंचनामा केला. या पंच नाम्यात ३ पैकी एक नळ रुक्मिणी तुकाराम धोत्रे यांच्या नावे असून इतर २ नळ अनाधिकृत असल्याचे किंवा याबाबत मनपा दप्तरी कोणतीच नोंद आढळून आली नाही.

याप्रकरणी मनपा प्रशासनाने नगरसेविका राजश्री धोत्रे (बाहेती) व अंकित बाहेती यांना नोटीस बजावून अनाधिकृत नळ जोडण्या अधिकृत करुन घ्याव्यात अशी नोटीस बजावली आहे. मात्र प्रभाग १६ मधील नागरिकांनी नगरसेविका राजेश्री धोत्रे (बाहेती) व अंकित बाहेती यांच्या विरोधात गुन्हा नोंद करुन दोन्ही अनाधिकृत नळ सिल करण्यात यावेत तसेच त्यांच्याकडून अनाधिकृत पाणी वापराची थकबाकी व व्याजासह दंड वसुल करावा अशी मागणी मनपा आयुक्त मानसी मीना यांच्याकडे केली आहे. याप्रकरणी कार्यवाही न झाल्यास बेमुदत उपोषण करण्यात येईल असा इशारा ही दिलेला आहे.

या निवेदनावर मनोज अभंगे, संजय आयाचित, प्रशांत गवंडगावे, विनोद वाकडे, शिवशंकर कावळे, सुभाष वर्मा, विनोद माटेफळकर, गुंडेराव डेंगळे, शिवप्रसाद मालू, पंडीत येलाले, चंद्रकांत सुर्यवंशी, एस. एस. वर्मा आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद ११ जून रोजी प्रस्तावित

## नव उद्योजकांनी नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढीसाठी ११ जून २०२६ रोजी लातूर येथे जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी नव उद्योजकांनी लातूर जिल्हा उद्योग केंद्र लातूर येथे आपल्या नव उद्योग तथा व्यवसायाची माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी केले आहे.

या परिषदेचा उद्देश जिल्ह्यातील गुंतवणूक वाढवणे, नवउद्योजकांना आकर्षित करणे आणि गुंतवणूकदार-व्यवसायिकांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि लातूर जिल्ह्याला विकासाचा केंद्रबिंदू बनवून जिल्हा आणि राज्याच्या विकासाला चालना देणे हा आहे. या परिषदेमध्ये नव उद्योजकांसोबत सामंजस्य करार होऊन त्यांना एमआययू वितरित केले जाणार आहेत.

# ‘लाईव्ह इव्हेंट्स’ च्या परवानग्यांसाठी ‘एक खिडकी’ व्यवस्था तयार करण्यात येणार - प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

## ‘एसओपी’ तयार करण्यासाठी विविध विभागांनी सूचना व सहकार्य द्यावे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ‘लाईव्ह इव्हेंट‘ क्षेत्राला चालना देण्यासाठी एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सर्व परवानग्या मिळण्याची सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी शासनाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. लाईव्ह इव्हेंट संदर्भातील सर्व परवानग्यांसाठी तयार करण्यात येणाऱ्या एसओपी करिता (सर्वसमावेशक विशिष्ट कार्यपद्धती) संबंधित विभागांनी सूचना द्याव्यात आणि सहकार्य करावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

लाइव्ह इव्हेंट क्षेत्राला विकास आणि प्रोत्साहन देण्यासाठी, २४ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठीत राज्यस्तरीय समितीच्या पहिल्या बैठकीत प्रधान सचिव सिंह बोलत होते. मंत्रालयातील परिषद सभागृहात ही बैठक झाली. बैठकीस महाआयटी आयुक्त भुवनेश्वरी बी, अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) प्रवीण साळुंखे, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी



अनगोळकर, पोलीस उपायुक्त अकबर पठाण आदी उपस्थित होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे यांनी प्रास्ताविकेतून लाईव्ह इव्हेंटसाठी करण्यात येणाऱ्या एसओपीची बैठकीत माहिती दिली.

प्रधान सचिव सिंह म्हणाले, सद्यस्थितीत कोणताही मोठा कार्यक्रम आयोजित करताना आयोजकांना पोलीस, अग्निशमन, वीज, महापालिका, महसूल आदी विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घ्याव्या लागतात. या प्रक्रियेत अधिकचा वेळ लागतो. यामध्ये आता वेळ, प्रक्रिया आणि कागदपत्रांची संख्या कमी करून संपूर्ण प्रक्रियेत एकसूत्रता आणण्यात येणार आहे. परवानग्या ‘सिंगल विंडो सिस्टीम‘ मध्ये देण्याची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र पोर्टलही विकसित करण्यात येणार आहे.

देशातील लाईव्ह मनोरंजन अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासह विकास करण्यासाठी महाराष्ट्रात केंद्राने दिलेल्या मॉडेल एसओपीमध्ये (मॉडेल एक्झिक्यूटिव्ह ऑर्डरमध्ये) आवश्यक बदल करुन राज्याची एसओपी तयार करण्यात येत आहे. कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. लाईव्ह मनोरंजन अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याचा विषय हा राज्य प्रशासनातील विविध विभागांशी संबंधित असल्याने विविध विभागांकडून कालमर्यादेत यासंदर्भातील कार्यवाही करण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.

लाईव्ह इव्हेंट, कन्सर्ट आदी कार्यक्रमांच्या परवानग्यांचे समन्वयन आणि इतर अनुषंगिक बाबीच्या नियोजनासाठी केंद्र शासनाच्या मॉडेल लाईव्ह इव्हेंट क्लिअरन्स प्रमाणित कार्यपद्धतीनुसार राज्याकरिता एक प्रभावी व उद्योग पूरक कार्यपद्धती तयार करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे लाईव्ह इव्हेंट्स आयोजित करण्याची प्रक्रिया सुलभ, गतिमान होऊन लाईव्ह इव्हेंट्स उद्योग क्षेत्राला मोठी चालना मिळेल. याशिवाय पर्यटन, गुंतवणूक विकासासह रोजगार निर्मितीलाही चालना मिळेल, असा विश्वासही प्रधान सचिव सिंह यांनी व्यक्त केला.

यावेळी पोलीस, बृहन्मुंबई महापालिका, अग्निशमन सेवा, बेस्ट उपक्रम, ग्रामविकास, राज्य पुरातत्व, आयटी आदी यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी विशिष्ट कार्यपद्धतीकरिता सूचना केल्या.


## टीसी व महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅगच हरवली आहे

कांबळे विजय अंकुश या नावाची जयक्रांती महाविद्यालय लातूरची ११ वी पासची टीसी. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नंदीस्टॉप लातूर प्रवासात हरवली आहे. तसेच मार्कमेमो, सनद, आधारकार्ड, पॅनकार्ड असलेली महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅगही यावेळी हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे योग्य बक्षिस दिले जाईल.

–संपर्क:७३८७८०८६३८



## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : RAHEMUNISSA BEGUM SHAIKH TO KHAJABEGAM SBDUL SATTAR SHAIKH.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the KHAJABEGAM ABDUL SATTAR SHAIKH will used by my family husband /wife, children and relative.

**OLD NAME :-** RAHEMUNISA BEGUM SHAIKH
**NEW NAME:-** KHAJABEGAM ABDUL SATTAR SHAIKH
**Address :-** AT POST BHADA, TA. AUSA. DIST. LATUR -413520
AADHAR NO.- 924767891128
Mob. No.- 8600368405


## उधर्ता ..

अवघ्यांपक्षाची धुरा
अवचित खाद्यांयेता
भावनीकपरिस्थिती
होतो अपघाती नेता

साहेबांचा वारसदार
एवढीचं असे अर्हता
अनुभव शून्य असूदे
वाटेजनतेस आहर्ता

रे तारणहारनिवर्तला
काळझाला अपहर्ता
संधी देऊन सुपुत्रांस
समय होतो उपकर्ता

फासे ते उलटे सुलटे
अशुभ दुःखद वार्ता
प्रतिकृती स्थानापन्न
गमावला खरा कर्ता

पाहिली पान सुपारी
दिसला न अडकित्ता
प्रसन्न हो कुणावरही
विचित्र भलती सत्ता

एखादी चूक भोवते
सत्ताधारी अहंकर्ता
योग्य ना रिप्लेसमेंट
ना मिळे कर्तुमकर्ता

अपघाती होता नेता
ना सिध्द हो नाकर्ता
खरी जनता अपेक्षा
व्हावा समर्थ उधर्ता

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# स्कुटीच्या डिक्कीतून एक लाख रुपये चोरले

**उदगीर/प्रतिनिधी :** शहरातील एलआयसी ऑफिस मध्ये पैसे भरण्यासाठी गेलेल्या एका शिक्षकाच्या स्कुटीची डिक्की तोडून आतील एक लाख रुपये अज्ञात चोरट्याने चोरले आहेत. या प्रकरणी शुक्रवारी (दि. २२) उदगीर ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत फिर्यादी शिवकांत आचारे (रा. समीत्र कॉलनी उदगीर) यांच्या तक्रारीनुसार , मंगळवारी (दि. १९) दुपारी फिर्यादी उदगीर शहरातील एलआयसी ऑफिसमध्ये पैसे भरण्यासाठी गेले होते. एलआयसी ऑफिस समोर त्यांची स्कुटी (एम. एच. ५५ – ५१०८) ही लावली होती. अज्ञात चोरट्याने स्कुटी लावलेल्या ठिकाणावरून बाजूला घेऊन जाऊन स्कुटीची त्यामध्ये असलेले एक लाख रुपये चोरून घेऊन गेला आहे. याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

# रेणापूर तालुक्यात १८८५३ पशुधनांचे लसीकरण पूर्ण!

**रेणापुर/प्रतिनिधी :** जनावरांमध्ये रोगप्रतिबंधक शक्ती निर्माण होण्यासाठी रेणापूर तालुक्यातील प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्यात पावसाळ्यात पशुधनास उदभवणाऱ्या घटसर्प व फऱ्या रोग प्रतिबंधक लसीकरण ८ मे २०२६ पासून सुरु झाले असून रेणापूर तालुक्यातील ४२ हजार ७१० पशुधनापैकी २२ मे पर्यंत १८ हजार ८५३ पशुधनाचे लसीकरण पुर्ण झाले असून २३ हजार ८५७ पशुधन अद्यापही लसीकरणापासून वंचित असून पशुपालकांनी घटसर्प आणि फऱ्या रोगप्रतिबंधक लसीकरण करुन घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ राघवेंद्र पडगलवार यांनी केले आहे.

घटसर्प हा तीव्र स्वरुपाचा संसर्ग जन्य रोग असून विशेषतः पावसाळ्यामध्ये हा रोग म्हशी व गाईमध्ये आढळून येतो. साधारणतः वासरे या रोगांना जास्त बळी पडतात. जनावरांना अचानक भरपुर ताप येणे, डोळे लाल होणे, श्वसन नलिकेत व घाटीस गळ्याभोवती सूज येणे, जिभेवर सूज येणे, श्वास घेताना त्रास होणे, श्वास घेताना घरघर आवाज येतो. जनावरे तोंडाने श्वास घेतात, नाकातून तोंडातून स्त्राव गळतो, व फुप्फुसांचा दाह होऊन जनावरे दगावतात. आशाच प्रकारे फऱ्या रोग हा सर्वसाधारणपणे ३ महिने ते २ ते ३ वर्षे वयोगटातील जनावरांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. जनावरांच्या मागच्या पुढच्या पायाच्या किंवा कोणत्याही मांसल भागावर सूज येते. जनावरास ताप येतो. जनावरे लंगडतात, सुजेवर दाबल्यास चरचर आसा आवाज येतो. वरील दोन्ही आजारामध्ये वेळेवर योग्य उपचार न मिळाल्यास २४ तासात जनावरे मरण पावतात. या रोगावर प्रभावी लस उपलब्ध असून पशुपालकांनी आपल्या जनावरास वेळेवर लसीकरण करुन घ्यावे व आशा प्रकारची लक्षणे जनावरास आढळल्यास अशी जनावरे वेगळी बांधून त्यांच्या चाऱ्या, पाण्याची व्यवस्था वेगळी करावी. तात्काळ जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही केले आहे. पावसाळ्यापूर्वी लसीकरण पूर्ण करण्यासाठी धावफळ सुरु आहे. तालुक्यात ४२ हजार ७१० पशुधन रेणापूर तालुक्यातील गाय, म्हैस, बैल पशुधन एकूण २६ हजार २९० पशुधन आहे या पैकी १२ हजार ३५३ पशुधनाचे लसीकरण झाले आहे या पैकी १३ हजार ९३७ लसीकरण करणे बाकी आहे तर तर तालुक्यात शेळी मेंढी एकूण १६४२० असून या पैकी ६५०० पशुधन लसीकरण झाले असून ९ हजार ९२० पशुधनाचे लसीकरण करणे बाकी आहे.आशा प्रकारे तालुक्यातील एकूण ४२ हजार ७१० पशुधना पैकी १८ हजार ८५३ पशुधनाचे लसीकरण झाले आहे तर २३ हजार ८५७ पशुधनाचे लसीकरण करणे बाकी आहे.


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAHEESTA NASIR SHAIKH TO SHAIKH SHAIYESTA NASIR
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SHAIKH SHAIYESTA NASIR will used by my family husband /wife, children and relative.

**OLD NAME :-** SHAHEESTA NASIR SHAIKH
**NEW NAME:-** SHAIKH SHAIYESTA NASIR
**Address :-** AT POST BHADA, TA. AUSA. DIST. LATUR -413520
AADHAR NO.- 735810192672
Mob. No.- 8600368405



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE

The Executive Engineer (EHV O&M Division) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr. No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 1 | Work of strengthening of earth mat by providing and installation of Enhance Chemical Compound (EHCC) earthing electrodes using Deep Driven Chemical Pipe (DDCP) method at 220 KV Jalkot Substation under EHV O&M Division, Latur. | EE/EHV/O&M/ TS/2026-27/T-01 | 7000040054 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:** The ADEE (O): Phone No. +918956304921
The DYEE (O): Phone No. +918554995271
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Division Latur**



## निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र

## सितारी विमा सेवा केंद्र

द.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.

वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत

जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA

एजंट भरती चालू आहे.

संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६